- प्रकरण तिसरे -

## ' उखडलेली झाडे ' व ' मातीखालची माती '
## या कथा संग्रहांच्या आधारे
## सामाजिक विचारांचा मागोवा

# प्रकरण तिसरे

## "उखडलेली झाडे" आणि "मातीखालची माती" या कथासंग्रहाच्या आधारे सामाजिक विचारांचा मागोवा ".

---

**"मातीखालची माती"** :-

आनंद यादव हे श्रेष्ठ दर्जाचे, उत्कृष्ठ आणि साहित्य अकादमी पुरस्कार मिळवणारे ग्रामीण साहित्यिक आहेत. त्यांच्या 'झोंबी' या कथासंग्रहाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. त्यांची "मातीखालची माती" हे 1965 सालचे पुस्तक. या पुस्तकातील रेखाटने प्रारंभी काळातील आहेत.

'खळाळ' हा त्यांचा अलिकडचा कथासंग्रह आहे. या कथासंग्रहाच्या मुलाखतीत व्यक्तीरेखाटने कशाप्रकारे सुचली हे सांगत असताना श्री. आनंद यादव म्हणतात -

"मी बी.ए. ला असताना मला माडगुळकरांचे 'माणदेशी माणसं' हे पुस्तक वाचनात आले. त्यांनी माणदेशच्या परिसरातील व्यक्तीरेखा जशा रेखाटल्या तशीच आपणही आपल्या गावातील अशा कांही लक्षात राहण्यासारख्या व वैशिष्टपूर्ण व्यक्तीरेखा मराठी साहित्यात चिरंतन कराव्यात म्हणून त्यांनी "मातीखालची माती" या पुस्तकातील व्यक्तीरेखा शब्दबध्द केल्या".

"मातीखालची माती" या कथासंग्रहाच्या सुरूवातीलाच यादवांनी म्हटले आहे की, -

"आई एकदा सहज म्हणाली ,

ही माती असली तरी मातीखालची माती ओली आणि उबदार असते , तिच्या उबीतचं पिकं जीव धरतात".

12393
A

ज्या व्यक्तीरेखा रेखाटल्या त्यातील प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव, गुण, दोष माहित नसता आपल्याला त्यांच्या अंतःकरणात जाऊन सखोल विचार करावा लागतो. त्यांच्याजवळ काही चांगले गुण असतील तसेच दोषही असतील. कांही प्रामाणिक असतील , काहींना परिस्थितीनुसार अप्रामाणिक बनविले असेल. सुष्ट-दुष्ट, विचारी-अविचारी, विकारी, सात्वीक असणे, योग्य ते गांभिर्य असणे अशा परस्पर विरोधी स्वभावाची माणसं यात असतात. या स्वभावांचे परीक्षण-निरीक्षण करणे, चिंतन लेखकाने केले म्हणून मातीखालची माती ओली, उबदार असते. कुसुमाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे -

"मातीत असशी, मातीत मिळशी,
मातीवर चढणे, एक नवा थर अंती".

या संग्रहातील व्यक्तीरेखा त्यांच्या कागल या गावातील आसपासच्या, शेजारच्या लोकांच्या आहेत. त्यात लेखकाने व्यक्त केलेली मते, त्यांनी केलेले चिंतन आहे. त्यांनी किती उत्कटतेने लिहले आहे हे 'मातीखालची माती' हा व्यक्तीरेखाटनांचा संग्रह वाचल्यानंतरच कळते.

यातील माणसे उध्दट नाहीत, अप्रामाणिक नाहीत. काहींच्याजवळ चांगले गुण अहोत तसे काही दोषही आहेत. त्यात पूर्ण अंधार आहे. अशी ती माणसे आहे त्या परिस्थितीत सुखासमाधानात जगणारी आहेत. त्यात दारिद्रय, पिळवणूक, हाल, अन्न-वस्त्र-निवारा यांची हेळसांड आहे. तरीही ती माणसे सुखाने जगणारी आहेत. त्यात एक-दोन कथा या वेगळयाही आहेत.

"ठेविले अनंते तैशेचि रहावे।
चित्ती असू द्यावे समाधान।।'

या तुकारामांच्या उक्तीचे पालन करणारी आहेत.

या कथासंग्रहातील माणसे इर्षाबाज असली तरी आहे त्यात जीवनाला चिकटून राहणारी आहेत. स्वतःला स्वतःमध्ये गुरफटून घेणारी आहेत. त्यांना बाहेर पडण्याचा मार्ग नाही. त्यातून त्यांची सुटका नाही. तरीही ती माणसे अडाणी आहेत, अज्ञानी आहेत, त्यांचा ज्ञानाशी संपर्क आलेला नाही अशी ती

माणसे समाधान मानून जगताना दिसतात. यात समाधान असले तरी आपण एकाच मातीतून जन्माला आलो आणि शेवटी मातीआडच जाणार म्हणून "मातीखालची माती" या शिर्षकाची यथार्थता मनाला पटते.

"मातीखालची माती" या कथासंग्रहातील पहिलीच कथा म्हणजे "हाताबुडी आलेला शिवा" ही होय. यात अनेक माणसे आहेत. स्वतः लेखक, त्यांचा लहान भाऊ शिवा, वडील दादा, बहिण धोंडू आणि आई.

सकाळी उठण्यासाठी शिवाला सांगावं लागते की, शिवा उठ, कासराभर दिस आला तो उठतो तोही पांघरून घेऊनच. च्या झाला का? हा त्याचा पहिला प्रश्न असतो. तेव्हा शिवा म्हणतो -

> "स्येच्या आयला स्यो दिस तर गापदिशी उगवतोय बघ. बुडताना मातुर स्येचा आई-बा बोंबलतोय. गिग्गी लागल्यागत डोंगरावर तसाच बसतोय". (पृष्ठ 3)

असं म्हणत शिवा उठतो. पाय कुणीकडं तरी फेकत झोपेच्या तालात चालतो. झोपेचा लालसर तवंग डोळयावर तरळत असतो त्याला सोडावं असं शिवाला वाटत नाही. रातभर गाढ झोप लागूनही त्याला ती पुरी होत नाही. दीसभर जीवापलीकडं काम झालेलं असतं. कंटाळा आलेला असतो. तोंड खर येऊन कडवट झालेलं असतं, मणका नि मणका ढिला झालेला असतो, पाय हेलपाटून हेलपाटून दुखत असतात. सकाळी उठून चालताना त्यांना भारही सहन होत नाही.

या वर्णनातून आपणास लहान वयातच कामाचा बोजा पडल्यामुळे एकदम त्रस्त झालेला शिवा आपणास दिसतो. तो कसेतरी तोंड धुवून, चहा पिऊन शेतात जाण्यास निघतो, जातानाच बैलाची पेंड नेण्यासाठी आठवण करून द्यायची हे तो ठरवूनच करतो. कारण कां तर त्याला मळयाकडे जायला जेवढा उशीर होईल तेवढेच बरे. काम कमी होईल असे त्याला वाटत असते. म्हणजेच एकीकडे उशीर झाला तर काम कमी होईल आणि दुसरीकडे उशीराने गेलो तर दादा शिव्या देतील अशी शिवाच्या मनाची द्विधा अवस्था होते.

या शिवाने लहानपणी खूप माती खाल्लेली असते. त्यामुळे हात-पाय किडमिडे

असतात. अंगात पांढरे मुंडे, कमरेला खाकी चड्डी आणि डोक्याला फेटा असा हा शिवा मळयाच्या वाटेनं जाण्यास निघतो. वाटेनं जाणारी माणसं म्हणतात -

'काय शिवा येरवाळी चाललाईस मळयाकडं?"

'दादांच्या शिव्या खायला".

शिवाच्या ह्या उत्तरानं वाटेचा वाटसरू हसतो आणि हसत-हसत विचारतो.

'मॉट हाय वाटतं?'

मॉट हाय, पाणी हाय .... भरल्यात कामं?" (पृष्ठ 5)

यातून रागीट असणारे दादा आणि नुकताच शेतीत काम करायला लागलेला शिवाचा कोवळा जीव यांच्यातला संघर्ष येथे यादवांनी चित्रित केला आहे.

हा शिवा लेखकाचा लहान भाऊ. एकाच आईच्या कुशीतून जन्माला आलेली हे दोन भाऊ पण त्यांची नशिबं किती वेगळी. आई म्हणते त्याची कुवत आहे, हुशार आहे, त्याला शिकू दे। म्हणून तो शिकला, मोठा झाला, उत्तम साहित्यिक झाला, शिवा मात्र तिथेच राहिला.

लेखक रत्नागिरीतून दिवाळीच्या सुट्टीत गावाकडे आल्यानंतर त्याला कामाला हातभार मिळणार होता. त्यामुळे त्याला बरं वाटत होतं. कारण दादा रागाच्या भरात मारतो. शिव्या तर गावानं ओवाळून टाकलेल्या देतोय. तो म्हणतो ,'तू आपला तिकडे शिकतोयस ते एक बरं आहे. तेव्हाँ मोठा भाऊ म्हणतो -

'दुखळाचे दीस आहेत, काढले पायजेत... "

पुन्हा शिवा म्हणतो -

"किती काढायचं? कायमचाच दुखाळ हाय आमच्या घरात, मला तर हे मळयातलं काम बघून पळून जावं असं वाटतयं.... दोन तीन म्हयनं झालं कूप लावताना पायात पळकीचा काटा बोटाच्या पेराइतका आत घुसला, कुजका हुता, तसाच आत मोडून

बसला. म्हयनाभर हिकडचं-तिकडं करू देईना, पाय सुजून दुधग्या भोपळयागत झाला. म्हयनाभर घरात -हायलो. पाय दुखायचा खरं पर सुखानं घरात बसायला मिळालं तेवढाच माझ्या जल्मात ईसावा बघ". (पृष्ठ 13)

वरील उद्गार सोसलेल्या वेदनांचे हळूवार कढच घेऊन येताना दिसतात आणि जसा हा शिवा आपल मोठा भाऊ आल्यावर तेवढाच कामाला हातभार म्हणणारा पण शेवटी तो वडिलांच्या हाताखालीच कामाला राहतो.

दादा आणि शिवा या दोघांच्यामध्ये दिसून येणारा संघर्ष हा दोन पिढयांमधला संघर्ष आहे. यादवांच्या कथेत प्रामुख्याने नायक हा शेतमजूरच दिसतो. त्याबरोबरच स्वतःची असलेली जमीन करीत-करीत मजूरी करणारे शेतमजूरही आपणास दिसतात.

लेखकाला आपल्या लहान भावाबद्दल आपुलकी होती. त्यांच्याबद्दल त्यांच्या मनात द्वेष नव्हता तो माझ्यासारखा शिकला असता तर पांढरपेशी झाला असता त्याला या प्रकारचे कष्टाचे जीणे जगावे लागले नसते. या प्रकारची कळकळ होती, करूणा होती.

यातील दुसरे व्यक्तिचित्र म्हणजे "चव्हाणाचा आबामा" होय. हा आबामा पैलवान आहे. तरणा होता तोपर्यंत पाचपन्नास खेडयात नाव कमविले. सदा कुस्तीत मान वर असायची. अगदी सुरूवातीलाच तो म्हणतो -

"माझ्यासारखं तरूणपण राजाच्या लेकालाबी मिळालं नसंल. लई मजा केली. जीवाची सगळी हौस भागविली. चारी चिज खाल्लं". (पृष्ठ 15)

असा हा आबामा एखादा मामलेदार असावा असे वाटते.

कोणीही कुस्तीत उतरलं तरी तो चित करायचा. आबामाचे नाव काढले की, त्याच्या जोडीने येणारा पहिलवान घाबरून जायचा. एक दिवस पाटलांनी त्याला मैदानात उतरायला सांगितले. त्याच्या जोडीला आबामा सारखाच असणारा ताकदवान पहिलवान दिला. पण त्याने बरोबर चाल केली.

आपला प्रतिस्पर्धी असणारा पैलवान याला कानात सांगितलं -

मला फक्त द्या रूपयं दे. मी दोन डाव खेळल्यासारखं करून खाली पडतो म्हणजे लोकास्नीबी खरं वाटलं?" (पृष्ठ 18)

असा हा आबामा केव्हांही फडात उतरल्यानंतर शाल आणि फेटा घेणारा शेवटी आपण हरणार असे वाटल्यामुळे तो बरोबर चाल करतो.

त्याने तरूणपणात अनेक रंग केले. दिसायलाही देखणा, गाजरासारखा रंग, तरण्या पोरी त्याला बघून पेटायच्या, जिवाला एकटा , घर-दार, जमीन-जुमला काही नाही. कुणाच्यातरी मळयात पडायचा, कुठेतरी जेवायचा. हे जरी काही नसलं तरी त्याच्याजवळ एक गुण होता. कुस्ती मारून येईल त्या पैशात राजासारखे खाऊन-पिऊन राहणे.

गु-हाळाच्या दिवसात सुगीचे काम करायचा. त्यात तो सगळयात जास्त मजुरी मिळवत होता. एका लांबच्या गावाला गुळवेपणा करायला गेला. तिथल्या एका ब्राम्हणाची विधवा पोर नादी लावून आणली. जीवाला जीव लागला. एका मनानं संसार करू लागले पण त्यांच्या संसारात तिसरा जीव आला नाही.

असा हा आबामा आपल्यालाही कोणी नाही तेवढाच आधार मिळेल म्हणून तिची त्याला दया आली. पन्नाशी उलटली आणि एका रोगाच्या साथीत त्याची जोडीदारीण गेली. जिवाला एकटाच राहिला.

उत्तर आयुष्यात त्याला उतरती कळा लागली आणि लेखकाच्या शेतावर तिथेच राहून काम करू लागला. पहिल्यासारखं त्याला आता जमणार कसं.? असा हा आबामा एकीकडे भरपूर खायला, वैभव असणारा आणि दुसरीकडे उत्तर आयुष्यात उतरती कळा लागल्यामुळे दारिद्रयाचे जीवन जगत होता.

शेवटी उसात पाणी पाजत असताना तिथे तो मरून पडला. आबामा हा प्रामाणिक होता. त्याच्याजवळ वासना-विकार नव्हता. म्हणून लेखकाच्या आईने म्हटल्याप्रमाणे मातीखालच्या मातीखाली आबामा उब देण्यासाठी गेला.

यानंतरची कथा म्हणजे "बापू" होय. तो जातीने मांग आहे. त्याला घर नाही, जमीन-जुमला नाही, त्याला समाजात स्थान नाही. असा हा बापू चोरी करणारा असतो.

पावसाळयात सगळीकडे हिरवेगार दिसते. रानात व बांधावर गवत वाढलेले असते. जोंधळया-भुईमुगाच्या भांगलणी झालेल्या असतात. झाडे हिरवीगार असतात. पिकांना भरपूर पाणी मिळाल्यामुळे ती अगदी तरारून उभी असतात. अशावेळी बापूचा त्रास लोकांना होत असतो. कारण बापू हा शेतातील भेंडया चोर, वैरणीचा कडबा घेऊन बाजारात विक असे करत असतो. म्हणून त्याच्या पाळतीवर लोक असतात. हातात भली मोठी ठिगळ लावलेली पिशवी असते आणि माळानं तो हळूच खाली उतरतो. पिकात घुसतो.

चोरी करून जे काही मिळेल ते पिशवीत टाकतो. कोणी आलंच तर पिकांमुळे त्याला दडायला जागा असते पण उन्हाळ्यात तसे नसतं. म्हणून त्याचे नाक्सुध्दा कोणी घेत नाही की पाळतीला राहत नाही. जो तो शेतकरी आपल्या कामात दंग असतो. चोरी करण्याइतपत काही मिळत नाही . तरीही चोरी करण्याचं सोडत नाही. शेतात शेतकरी असो अगर नसो त्याला त्याची फिकीर नसते. पण एखादा चतूर असणारा शेतकरी पळत येतो आणि बापूला म्हणतो -

"बापू भेंडया तोडल्यास न्हवं का या ताटव्याच्या?"

"हे ऽऽ चार घेटल्या गा दिसतानं, कोरडयाशाला काय न्हवतं."

"हिकडं आण त्या भेंडया. तुझ्यापायी घाटल्या न्हाईत. चोरून खायाच्या वाटणीचं श्यान खावं" (पृष्ठ 31)

असा रंग दिसला की बापू विशिष्ट तारेत बोलतो.

अं ऽऽ। काय खावं गा आम्ही मग ? आम्हास्नी का इनामं हाईत व्हय, रयता हो?" (पृष्ठ 31)

या वर्णनातून पोटाला मिळत नाही तरी चोरी करून पोट भरणारा बापू आपल्याला दिसतो. पण चोरी करणे

हा बापूचा गुन्हा का? नव्हे, तर परिस्थितीमुळे त्याला चोरी करणे भाग पडते आणि तो चोरी केली हे नाकबूल करतो.

परत जेव्हां चोरी करावयास जातो तेव्हां मात्र प्रथम लेखकाच्या घरी जातो. दादांनाही (लेखकाचे वडील) तेवढेच हवे असते. पावसाळयात काम होत नाही. एकटे असले की तरूणपणचे दिवस आठवतात. म्हणून गप्पा मारायला येतो. दोघांच्या गप्पा चांगल्या अर्धा तास रंगायच्या मग हळूच बापू आपला विषय काढतो.

"आसपासचं शेतकरी समदं गेलं काय घराकडं?"

"कां चोरीला आलाईस वाटतं ?" दादा हसत हसत विचारतात.

"व्हय बा, पोटाला काय न्हाई सांजचं एकदा भारा बाजारात न्हेला म्हंजे तेवढाच रूपया मिळतोय'. (पृष्ठ 34)

एकीकडे चोरी नाकबूल करणारा बापू व दुसरीकडे चोरी कबूल करणारा यातच त्याचा प्रामाणिकपणा दिसतो. आणि शेवटी बापू हसत हसत म्हणतो -

'न्हाईगा, उन्हाळयाचं दीस, कुठंच हात सरकंना, पोटालाबी काय न्हवतं ... काय करतोस। जगलं तरी पाहिजे. हे पॉट गप बसू देतयं व्हय?"(पृष्ठ 39)

दरिद्री परंतु रंगेल व्यक्तीमत्व यादवांनी याठिकाणी उभे केले आहे. त्यामुळे ही कथा वाचताना लक्ष्मण गायकवाडांच्या "उचल्या" ची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

जर त्याला घर-दार, जमीन-जुमला, समाजात स्थान असते तर त्याने चोरी केली नसती. असा हा बापू आपल्या मनात ठसतो. चोरी करणे हा मांगांचा दोष पण त्याच्याजवळ काही चांगले गुणही असतात हे आपण विसरतो आणि चोरी करतो म्हणन त्याला वेगळे काढतो.

"बापू" या कथेसारखीच असणारी कथा म्हणजे 'आक्कूमावशी' होय. आक्कूमावशी एकटीच आहे. मुलगा आहे पण तो असून नसल्यासारखाच. तो वाईट मार्गाला लागल्यामुळे तिचा संसार

उध्वस्त झाला. घरातील होते नव्हते तेवढे विकले. त्यामुळे ती उघडयावरच पडली. ती मुलाला अडवते, रडते, मार खाते.

गल्लीतल्या बायका तिला चटणी कांडायला, दळण निवडायला बोलवायच्या, पेरणीच्या वेळी शेतक-याच्या घरात बी काढण्यासाठी असायची... अशी कामं करून येईल तो दिवस ढकलीत होती. कुठं काम नसलं की लेखकाच्या आईला विचारायची -

"तारा, येऊ कां गं आज तुझ्यात कामाला? काढ कायतरी काम. आठ पंधरा दिवस कुठंच काम न्हाई बघ. दोन आणं कमी देईनास, पर तुझ्याकडं कामाला येते". (पृष्ठ 43)

तिला काही काम नाही याची लेखकाच्या आईला जाणीव होती. लेखकाच्या आईजवळ जमिन होती असे नव्हे तर ती कमी पैशात काम करते. आपल्यालाही कमी पैशात रोजगारी मिळतो आणि तिलाही हातभार मिळेल असे लेखकाच्या आईला वाटे.

खायला-प्यायला नाही, पांघरायला वस्त्र नाही अशी ही आक्कुमावशी. गोपाळच्या पोराच्या गळयातील सोन्याची पेटी खेळताना आक्कुमावशीच्या दारात पडते. ती पेटी ती उचलते. तिने ती पेटी उचलली यात तिचं काही चुकलं का? चावडीवर बोलावल्यानंतर गोपाळला ती म्हणते,

"बाबा पोटाला नव्हतं, म्हणून मी घेटली. परगावासनं आलेल्या एका बाईला मी इकली. तिचं नाव गाव मला ठावं न्हाई. इसावर पाच रूपयाला इकली. सात रूपय म्या खाल्लं. उरल्यालं बाकीचं तुला घरात गेल्यावर देते... .. चल घराकडं". (पृष्ठ 47)

तिने मुद्दाम चोरी केली नव्हती. ती पडली म्हणून घेतली. पण तिच्यावर चोरीचा आळ घेतला जातो. हा स्त्रीवर होणारा अन्याय नव्हे कां? सात रूपये मी घेतले व अठरा रूपये परत देते यात तिचा प्रामाणिकपणाच नव्हता कां? जर तिने प्रामाणिकपणा दाखवला नसता तर उरलेले पैसे परत दिलेच नसते.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

'भूक' या मुलभूत गरजेसाठी गरगरणारी आक्कुमावशी आपल्या मनाचा ठाव घेते.

चोरी करते म्हणून कोणी काम देईना. काम नसल्यामुळे पोटाला काही मिळत नव्हते. सर्व गावाचा बेंदराच्या सणाचा नैवेद्य तिच्या परडयात असणा-या ताईबाईला जातो. उरफाटया पकाचं कोंबडं, अंडे, नैवेद्य देतात. ते ती अधाशासारखं काढून घेते व आपले पोट भागवते. यापाठीमागे तिची प्रचंड भूक दडलेली आहे. प्रसंगी तिला दारिद्रयाचं जीणं जगावं लागतं.

यानंतरचे व्यक्तिचित्र म्हणजे "गडी" हे होय. या कथेतील वर्णन लेखकाच्या घरातील आहे. त्यांच्या घरी कामाला गडी आलेला असतो. त्याचे नाव म्हादूबा. तो मुलखाचा आळशी असतो. जिवाला एकटाच असतो. त्याने काम केले असते, आळसपणा केला नसता तर बायका मुले, आपला गोतावळा निर्माण केला असता. पण तसे तो करत नाही. त्याच्याकडे कोणतीही गोष्ट नव्हती असे नाही . त्याला दोन वेळ पोटाला मिळत होते. अंगावर घालायला कपडे मिळत होते. पण कुठेही कामाला गेला तरी तिथे तो तग धरून राहत नव्हता.

आई माळवं विकायला गेली होती तेव्हां लेखकाच्या मामाने घरी कामाला गडी पाहिजे होता म्हणून दिला होता. तिथे कामाला राहण्याअगोदर तो बामलाच्या मळयात कामाला होता. तिथून कां निघालास असे दादा विचारतात तेव्हां म्हणतो -

> "हे बघ बाबा, तू माझ्या पोरावाणी , तुला मी कशाला खोटं सांगू ? तिथलं काम मला पसंत न्हाई, म्हणून आलोय तुझ्याकडं घोंगडं झाडत". (पृष्ठ 55)

तो कोठेही तग धरून राहत नाही आपल्याकडेही मधूनच सोडून जाईल की काय याची दादांना शंका वाटत होती.

त्याला ताट भरून दोन वेळेला ताक-कण्या, चार-आठ, दिवसातनं पान सुपारीला चार-आठ आणे दिले, फाटके-तुटके कपडे, वर्षाकाठी इच्छेला येईल ते दिलं तरी चालतं. साहजिकच कमी पैशात आपणास गडी मिळतोय म्हणून दादांनी लगेच होकार दिला.

तरणे गडी ठेवायची त्यांची कुवत नाही. कारण वर्षाला साडे तिनशे रूपये पान सुपारीचा खर्च. त्यामुळे ते महाग पडायचे. शिवाय ते तरणे गडी गावातल्या लोकांना भेंडी बाबचीचं माळवं देतात. रात्रभर भटकून उजडायला मळयात येतात. तोपर्यंत मळा लुटून नेला तरी चालतो. जमीन थोडी आहे. माळवं विकून येईल त्या पैशात घर चालवायचे असते.

म्हादूमा जिवाला एकटा असल्यामुळे खूप घाबरतो. सात-आठ दिवस गेल्यावर गोठयातील चिपाडं काढत होत. तेव्हां बैलानं भुजीवलं आणि तो ओरडायला लागला. मोट धरायची वेळ टळून गेली तरी तो उठायचा नाही. पहाटे उठून दादांच हे काम करायचे. त्यातून दादांनी वैरण टाकायला सांगितले. तरी हा उठून चहाला भांडं ठेवायचा आणि म्हणायचा -

"आता थंडीत कुठं जाऊ? वाईच च्या करून पितो. पोटात धग घालतो, नि मग थंडीत जातो . माझ्या जिवाला मी एकटाच हाय कोण जपणार हाय मला?" (पृष्ठ 58)

त्यामुळे दादांना म्हादूमाला काही बोलता येत नव्हते. दादांचा स्वभाव रागीट असूनसुध्दा त्याच्यासमोर ते गप्प बसायचे. कारण गडी फुकटचा असतो. निघून जाईल की काय ही भिती.

पुष्कळ दिवस सहन केले तरी तो काही ऐकत नाही. सारखा कामचुकारपणाच करतो. म्हणून दादा वैतागले आणि एक दिवस त्याला बदडून काढला. म्हादूमा ओरडत निघून गेला. असा हा गडी यादव चित्रित करतात.

या कथासंग्रहातील "सखाराम" ही एक वेगळीच कथा आहे. सखारामला जोगता म्हणून देवाला सोडलेला असतो. कारण यल्लुबाई त्याच्या स्वप्नात आली होती. तेव्हापासून तो बायकांसारखे राहत होता. गावातील कोणीही त्याला बोलत नव्हते. असा हा सखाराम लोकांशी प्रेमळपणे वागायचा. त्यामुळे तो लोकांचा प्रिय झालेला होता. एखाद्या कलावंतिणीला जमणार नाही तसे त्याचे वागणे होते. अगदी कपाळावर कुंकू, अंगात चोळी, या सर्वांच्या जोडीला भंडा-याची टिकली लावायचा. असा हा सखाराम उठून दिसायचा. या पोषाखाला त्याची चालही साजेशी आहे . असा हा सखाराम आपल्या डोळयासमोर उभा राहतो.

त्याचे उठणे-बसणे नेहमी बायकातच असते. नेहमी बायकांप्रमाणं कामं करतो. त्याला त्याच्याबद्दल काहीही वाटत नाही. अगदी प्रत्येकाच्या घरात चुलीपर्यंत जाऊन विचारपूस करतो. पण नवख्या माणसाला ही कोणी तरी बाईच वाटते.

जेवण झालं की तो बाजारपेठेतून पाणी आणायला तयार असतो. दुस-यांनी आपल्याकडे पहावे असे त्याला वाटत असते तो मुद्दाम तशा वेशात राहत नाही, परिस्थितीनेच त्याला असे बनावे लागले होते. कारण त्याला फक्त आई-वडिल आहेत. इतर कुणीही नाहीत. त्यात आईला दिसत नाही आणि वडिलांना दमा त्यामुळे पोटाला काय खाणार?"

पाणी भरले की बाजारहाट आणि बाजारातून आणलेले बिस्कीटं, चिरमु-याचे लाडू, भजी मुलांना देतो. यातून त्याचे मुलांवर खुप प्रेम असते हेच जाणवते.

तो कोणाचीही कामं करायला नाही म्हणत नाही. कुणाचे मुल रडत आहे, त्याला घे। अशी कामे तो करतो. असेच दिवस निघून जातात आणि एक दिवस सखाराम निपाणीला एका चांभाराच्या पोराचा हात धरून निघून जातो. त्याला जाऊन वर्ष झालं होतं त्यामुळे गाव आठवणी फिक्कट होत चालल्या होत्या.

दहा-बारा वर्षांनी लेखक सुट्टीवर आले होते. संध्याकाळी दारात बसले असताना सखाराम येताना दिसला. अंगावर मळकट जुनेर, केसाला ब-याच दिवसात तेल मिळालं नव्हतं फक्त विटलेला सखाराम दिसत होता. पूर्वीचे वैभव जाऊन दारिद्र्याचे जीणे जगत होता. तो शेवटी म्हणतो -

"आई यल्लुबाई, मला ही वासना काय म्हणून दिलीस? कां छळ मांडलाईस माझा?"

(पृष्ठ 70)

असा हा सखाराम निराशेच्या गर्तेत सापडलेला आपणास दिसतो.

यादवांनी सखारामसारख्या माणसाच्या मनातील इच्छा व्यक्त केल्या आणि जोगत्याच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. खेडयांमध्ये लोक अंधःश्रध्देला बळी पडतात वासना/विकारांवर त्यांना ताबा ठेवता येत नाही. त्यामुळे विकृत असे वर्तन त्यांच्या हातून घडते.

SHIVAJI

प्राणीमात्रावर प्रेम करणारा बाबजी बल्लाळ ही या कथासंग्रहातील व्यक्तिरेखा होय. गल्लीत बाबजीचं निर्मळ घर, दारात सात-आठ घरं बांधण्यापुरती जागा, बाजूला दोन लिंबाची झाडं, उन्हाळयात उरलेल्या जागेत शेणी वाळत टाकलेल्या, घराच्या कडेने कळकीचा कूप लावलेला आहे. त्याच्या आतल्या बाजूला वरणा, घारीच्या भोपळयाचे वेल , कुठं राजगिरा, मेथी, पोकळा त्यातून उठून दिसणारे असे हे बाबजीचे घर आपल्या मनात घर करून राहते.

रकमामावशी ही बाबजीची बायको, लग्न न करता राहिलेली. पण ती लग्नाच्या बायकोसारखी बाबजीशी वागते तोही तिला बायकोगत वागवितो. ती जोगतिण असते पण जोगतिणीसारखे राहत नाही. कधी जोगवा मागायला जात नाही, कधी ढंग करत नाही. वाटेत कुणा पुरूषाबरोबर बोलत नाही, सगळी गावं जोगवा मागायला हिंडत नाही. यल्लुबाईचा वार म्हणून गल्लीतच प्रत्येक शुक्रवारी पाच घरं मागते. "आकुंदी जोगवा" असे न म्हणता 'जोगवा वाढ गं' म्हणते अशी ही रकमा इतर जोगतिणीपेक्षा आपणास वेगळी वाटते.

बाबजीला शेत, घर, आई-वडिल नव्हते. म्हणून रकमा व बाबजी एक दिलानं संसार करू लागले. पोर झालं पण जन्मतःच मेले. त्यानंतर काही झालं नाही म्हणून त्याने आपल्या घरात शेरडं, कुत्री बाळगली होती. त्यांच्यावर तो जिवापाड प्रेम करत होता. शेतात जरी गेला तरी त्याच्याबरोबर ही पिल्लावळ असायची. येणा-या - जाणा-या माणसाने तंबाखू मागीतली की तो चिलीम भरून स्वतः वढायचा व नंतर दुस-याला द्यायचा.

प्राणीमात्रांवर प्रेम करणारा बाबजी बल्लाळ स्वतःच्या कुत्रीची तीन-चार पिल्लं असतात. हुपरीचा पाटील शंभर रूपयांला त्यातील एक पिल्लु मागतो. तेव्हा बाबजी म्हणतो -

'न्हाई बाबा, पोरागत पाळल्यात मी".

'रोजगारी माणूस दिसतोस. सात आठ महिन्याची पोटगी निघंल तुझी".

"निघली तरी काय करायची मला? मायेला मोल न्हाई". (पृष्ठ 85)

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR *

प्राणीमात्रावर जीवापाड प्रेम करणारे बाबजी आणि त्याची बायको रखमा यांचे चित्रण यादव येथे करतात.

यानंतरचे व्यक्तिचित्र म्हणजे "फुलाआत्ती" होय. ही फुलाआत्ती लोखंडाचे तोंड असल्यासारखे सतत बडबडत असते. तिच्या जिवाला चैन नसते. दिवसरात्र कष्ट करायचं आणि बडबडत राहायचं एवढंच तिला माहित असतं अशी तोंडगळ असणारी फुलाआत्ती आपल्यासमोर उभी राहते.

फुलाआत्तीला एक मुलगा असतो. पण तोही नवसानं झालेला. काही काम करायचा नाही. पैशानी खेळायचा आणि वेळप्रसंग पडलाच तर मनावर उदार होऊन घरातील तांब्या, भांडं, काय हाताला लागेल ते विकायचा. आक्कुमावशीच्या मुलासारखाच असणारा हा फुलाआत्तीचा मुलगा वाटतो.

आपल्या पोराच्या पोटाला सहाही मुलीच झाल्या; मुलगा नाही म्हणून सुनेचा छळ करते. पण सगळया पोरीच झाल्या यात तिचं काही चुकलं का? तिला मुलगा म्हणजे वंशाचा दिवा वाटतो. सुनेला सकाळी उठवताना ती म्हणते -

"उठ की गं रांडं "

"दिसाची किरणं चांगली सान्यातनं पडाय लागली की मग उठ. आता उठू नगं. आई बा मरतील तुझं" (पृष्ठ 95)

सकाळी सकाळी शिव्या दिल्याशिवाय तिचा दिवस सुरू होत नाही.

सगळया गावातल्या बायकांची बाळंतपणं करते. त्यात तिचा हात धरणारा कोणी नाही, गल्लीत कोणी मेलं तरी त्याच्या घराकडं ती जाऊन येते, तिथल्या लोकांना समजावते, त्यांच्याबरोबर रडते आणि म्हणते .

"जाऊ दे बाई. सोनं झालं त्येचं. देवाच्या सावली खाली गेला आता त्यो, त्येला रडून आडवी नदी का आणायची? आगंऽ जगाची ही अशीच रीत हाय नवी पानं थोरली व्हायच्या वक्ताला जुनी पानं झडून जायचीच... रोज मी पाच सात बाळंतपण करते. एवढी जलमत्यात मग एक दोन तरी हितनं उठून जाणारच. जोडा लेकाच्या पायाला आला की, बाऽ चा भरवसा न्हाई म्हणायचं. त्येच्यात जीव अडकून हिंडायचा

SHIVAJI UNIVERSITY

> न्हाई ... उठ बघू, चुळ भर." (पृष्ठ 100)

एकीकडे सुनेचा छळ करणारी आणि दुसरीकडे लोकांना शहाणपण सांगणारी फुलाआत्त्या आपल्या मनात ठसते.

सुनेला मुलगा व्हावा असे फुलाआत्याला वाटत असते म्हणून अजुनपर्यंत थांबलेली. सून सातव्यांदा गरोदर राहते. अगदी खंगून-खंगून तोळामासा झालेली. शेवटी मुलगा होतो तेव्हा सुनेला इथे ठेवू का तिथे असे तिला वाटत असते.

यानंतरची कथा म्हणजे "भाडकरू दत्तू" होय. दत्तूमाचं घर सुध्दा त्याच्या नशिबागत लांब अंधा-या बोळाच्या पलिकडे होते. दत्तूमा दुस-यांदा शेतात भाड्याने औत नेणारा रोजगारी असतो. कधीही बिनकामाचा दिसत नाही. कोणीही बोलावलं तरी न जाता सरळ आपलं काम भलं नि आपण भलं. सतत काम करूनही कधी जवळ पैसे बाळगून नाही. सदा 'कुत्तर-ओढ' च असते. त्यातूनच एखादा बेंडील माणूस असला तर पटका ओढून घेतो. त्या पटक्याचे तीन तुकडे असतात. तसाच तो पटका गुंडाळतो आपल्या कामाला लागतो. काहीही हालचाल करत नाही आणि म्हणतो -

> "गप बसा की मरदा हो, तुमच्यावाणी मला बापाघरचं वतन न्हाई. भाडंकरू माणूस मी. हातावर संसार झेपावा लागतोय मला चौघाजणांचा". (पृष्ठ 107)

घरात बायको, दोन पोरं असतात . त्यामुळे त्यांच करता करता अगदी थकून जातो. दुस-यांदा मळयांत बैल, औत, अवजारे ठेवतो. कारण त्याला जागा नाही मग बैल बांधणार कुठे? बैल उपाशी आहेत हे त्याला बघवत नाही म्हणून तो वैरण चोरतो. वैरण कां चोरलीस म्हणून म्हादूमा त्याला बेदम मारतो. त्यात दत्तूमा विव्हळत बसतो. मार खाल्यामुळं आठ दिवस अधू होता. त्यामुळे त्याला रोजगाराला कुठं जाता येत नाही. बैलांना खायला कांही मिळत नाही त्यात ती जास्तच थकतात. पण दत्तूमाला चोरी केल्यामुळे रोजावारी कामही कोणी देत नाहीत. मगदूमाच्या मळयात बैलं बांधलेली असल्यामुळे तेथून त्याला हाकलून देतात. तेथून लेखकाच्या घरी येऊन राहतो. एक दिवस दत्तुमानं एक बैल विकला आणि दुसरा कमी किंमतीत थकलेला बैल घेऊन आला. विकून उरलेल्या पैशात वैरण आणतो. असा हा दत्तूमा व्यवहार करून अडचणीत आलेला दिसतो.

अगदी मनावर ठसणारे व्यक्तिचित्र म्हणजे "पोरका दिन्या" होय. चोखून-चोखून आंब्याची कोय उकीरडयावर टाकावी तिला शेणाचं खत मिळावं, खरकटया पाण्याची ओल चिकटावी. तिथचं जगावी तसा हा पोरका दिन्या आहे.

दिनाचे काळे ओबड धोबड अंग, पायाकडे पाहिले तर वडाच्या झाडासारखा दिन्या गिड्डा आहे, भरपूर रूंदाटा, खायलाही फारसं काही मिळत नाही. कण्या, भाकरी, आमटी कधी ताकाचं पाणी, एखाद दुस-या दिवशी घासभर भात, अंगाचा पिंड मात्र दगडात कोरून काढलेल्या पुतळयासारखा असे हे दिनाचे व्यक्तिमत्व आपल्यासमोर उभे राहते.

पाच-सात वर्षाचा असल्यापासून ढोरं राखतो. थंडी असू दे, पाऊस असू दे. तो ज्यावेळी उठायचा तेव्हांच उठतो. सगळी कामं दिवस उगवायच्या आत करतो. त्याला आई ना वडील मग कोण विचारणार? शाळेत जातो तेव्हां दुपारीच तेवढी मोकळीक. लहान वय असल्यामुळे त्याला काही समजत नाही. सिनेमाच्या फिल्मा बघण्यासाठी तो रंगात आलेला असतो. तेवढयात गणपा येऊन त्याच्या पाठीत लाथ घालतो व म्हणतो -

> "सुक्काळीच्या, कवाधरनं ओरडाय लागलोय मी। हाका ऐकू येत नाहीत? कानात खुटटं मारल्यात व्हय रं? कामं कुणी तुझ्या बाऽनं करायची?"
>
> "काय करू मग? सरळ सांग की. मारतोय कां सारखं?
>
> "उलट बोललंस तर त्या पाटात घालून तुडवीन कचाऽ चा. मोटा धरायच्या हाईत. शेणं भर जा त्या ढोरांच्या पाठीमागची. तुझ्या नावानं बसल्यात बघ पू तिथं माशा मारत". (पृष्ठ 122)

यातून गणपासारखा माणूस आई विना पोरका असणा-या दिनाला कसे हालहाल करून जीवन जगावयास लावतो हेच दिसते.

दिनाच्या आईच्या नव-याला खुनाच्या आरोपाखाली शिक्षा झालेली असते. तो तुरूंगात

असतो एक - दोन वर्षे वाट पहाते. असाच किती दिवस जन्म काढायचा म्हणून दिनाची आई भैरूजवळ राहते. आणि तिला दिना होतो. दहा-बारा वर्षांनी तो येतो आणि हाताला धरून ओढत घेऊन जातो. मग भैरू लेखकाच्या वडिलांकडे येतात आपला मुलगा त्यांच्या हाती सोपवतात. आणि दिनाचे वडिल पोट भरण्यासाठी लांब मुलूखात निघून जातात. आई-वडिलांची माया मिळालेली नसते. त्यामुळे तो निराधार होतो.

अशा या दिनाच्या जीवनाची फरफटच होते . तो कमालीचा दारिद्रयात जगतो. त्यामुळे या कथेला लेखकाने दिलेले शिर्षक योग्यच वाटते.

यानंतरची कथा म्हणजे 'तपस्विनी' होय. ही तपस्विनी म्हणजे नानी, ती शंकराचे व्रत करते. गर्भश्रीमंत घराण्यातील ही नानी सोज्वळ, परमेश्वरावर अपार श्रध्दा असणारी आहे. त्यांच्याच वाडयापासून एका हाकेवर शंकराचं जुनाट देऊळ आहे. गावापासून निवांत ठिकाणी बांधलेल्या देवळासमोर दोन वर्षाच्या वासरासारखा प्रचंड नंदी पिंपळाच्या मुळात आहे. अशाठिकाणी नानी जाऊन देवाची उपासना करते.

सात वर्षाची झाल्यापासून नानी उपवास करते. अठरा वर्षाची असताना तिचे लग्न झालं. तेव्हा नानीने सोळा सोमवाराचं व्रत केले आणि ब्राम्हण भोजन घातले. दिवसरात्र ती शंभोची तपश्चर्या करत बसायची.

दुस-या दिवशी सोमवार असल्यामुळे भल्या पहाटे उठून नानी सगळं आवरून देवपूजा करायला खोलीत गेल्या, दार लावून घेऊन पुजा करू लागल्या. थोडा वेळ गेला आणि शांत व खंबीर आवाज आला.

> "शंभो, मी तुझी बारा वर्षे सेवा करणार आहे. वर्षातून एक महिना अन्न घेणार नाही . माझ्या हातून ती घडणार असेल तर हा कापूर संपूर्ण जळेपर्यंत माझं मन स्थिर ठेव. घडणार नसेल तर तसं करू नको ". (पृष्ठ 137)

यातून श्रध्दा आणि निष्ठेच्या जोरावर परमेश्वराच्या अस्तित्वाची त्यांना जाणीव होती हेच दिसते.

नानीच्या ठिकाणी परमेश्वराबद्दल अपार श्रध्दा होती . बारा वर्षे खडतर व्रत करण्याची नानीच्या मनाची तयारी त्यामुळे घडून येणारा साक्षात्कार म्हणून या गोष्टी अत्यंत महत्वाच्या

वाटतात. या श्रध्देचंच सामुहिक मनात झालेलं रूपांतर आणि लोकांचा अध्यात्मिक शक्तीवर असलेला प्रचंड विश्वास ह्या ठिकाणी दिसून येतो व परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारी ही कथा वाटते.

यादवांच्या कथेतील सगळी माणसे दारिद्रयाने पिचलेली, दु:खी-कष्टी आहेत पण गर्भश्रीमंत घरातील नानी अत्यंत सोज्वळ असणारी तपश्चर्या करत होती म्हणून ती यादवांना दिसली. कागल सारख्या गावात नानीसारख्या काही स्त्रिया आहेत. म्हणून त्यांनी ती चित्रित केली असावी. नानीची दखल घेतली ही एक आनंदाची गोष्ट आहे.

"धोंडबा खादाडया" ही व्यक्तीरेखा आनंद यादवांनी अतिशय विनोदी पध्दतीने रेखाटली आहे. धोंडबा आणि गणा हे सख्खे भाऊ पण दोघांच्यात जमीन अस्मानचा फरक असतो. धोंडबा जाड तर गणा काटकुळा असतो. दोघांचे पटत नसते. म्हणून घराची वाटणी होते. गणा खाली राहतो तर धोंडबा माडीवर राहतो. गल्लीतली मुलंही चिडवत असतात. त्याला भरपूर खायला लागायचे जर का दिले नाही तर बायकोला मारच बसायचा त्यामुळे ती नारळाच्या झाडासारखी झाली होती.

संसाराला हातभार होईल, कासंडीभर दुध निघेल, चोळी लुगडयाला होईल म्हणून धोंडबाच्या सास-याने लेकीला एक म्हैस दिली होती. बायकोनं कुठेही दुध झाकून ठेवले तरी तेथून शोधून काढून दुध प्यायचा, जर नाही दिलेच तर बेदम मार बसायचा वर आणि आपलचं खरं करणारा धोंडबा आपल्या चटकन लक्षात येतो आणि मनात ठसतो.

कुणाच्याही शेतात जाऊन शेंगाचा, मक्याच्या, कणसाचा, काकडया, हरब-यांचा हंगाम आला की धोंडबा तिथे जाऊन खाऊन यायचा आणि वर कुणीतरी नेलं म्हणून सांगून रिकामा व्हायचा. उन्हाळयाच्या दिवसात चार-पाच दिवस लेखकाच्या घरी कामाला होता. कुठं खोडव्यांची ढेकळं फोड, खत ओढ अशी कामं तो करी. बैल नसताना स्वत: मोट धरायचा. कुणाची जोंधळयाची पोती हलवायला नाही म्हणायचा नाही.

धोंडबाचं खरं आडनाव केरलेकर पण सतत खात असतो म्हणून त्याचं खादाडया हे नाव

पडलं. या खादीपायी कुणाल्लाही काहीही मागायचा. एकदा संतरामाच्या घरातल्या गोठयात साप निघाल पण तो कुणीही मारायला धजत नऱ्हते. धोंडबा मात्र खच्चून मारतो.

मार खावून-खावून बायको एकदम बारीक झाली होती. त्यातच तिला हाडांचा रोग होता. औषधपाणी करूनसुध्दा तिचा आजार बरा होत नव्हता. डॉक्टरांनी ऑपरेशन करायला सांगितले होते. धोंडबाजवळ पैसा नव्हता. तो असणार कुठून? एक तर काम करायचं नाही. आणि केलंच तर त्याच्या खाण्यासाठीच ते पैसे जातात. काय व्हायचं ते होऊ दे. म्हणून धोंडबा गप्प बसला. बायको मेली, तेव्हा धोंडबा म्हणतो -

> "मग काय! खंगली खंगली नि आज मोकळी झाली. मेली, बरं झालं. लई हाल सोसलं तिनं. अन्नाइदमान उपाशी मेली. हरघटकेला माझा मार खाल्ला. हूं न्हाई का चूं न्हाई. माझा सोभाव एक खादाड, त्येच्या भणं कवा येवस्थशीर आन्न तिला मिळालं न्हाई". (पृष्ठ 154)

असा हा धोंडबा बायको मेल्यनंतर तिची त्याला जाणीव झाली. बायको मरून दोन-तीन महिने झाले नि इठा मिसाळणीच्यात जाऊन राहिला.

असा हा धोंडबा आपल्या मनात घर करून राहतो.

मांगळीच्या रानात गोपाची पट्टी आहे. दोन आ-यांची, लंगोटीतच लांबच लांब. खुप पाऊस पडला तर रानात काहीतरी येते. त्यातूनच गोपाच्या रानातून पायवाट पडते. आणि त्यात निम्मी पट्टी तुडवा होऊन जाते. राखणीला बसून माणसं जायची यायची बंद कर म्हटलं तरी त्यांच्या पायाच्या पुण्याईनं पिकल म्हणून गप्प बसायचा. असा हा "गोपा" पायाने लंगडा आहे.

शेतात काही पिकत नाही म्हणून रोजगार करतो. रोजगार काही मिळाला नाही तर स्वत:च्या शेतात जातो तेथे बसून आणलेली भाकरी खातो. एखादेवेळी खायला काहीच नसेल तर शिळीपाळी आमटी, कवळे कांदे, कुणाकडे पान सुपारी मागतो असा हा गोपा अन्नासाठी महाग झालेला असतो. त्याला दारिद्रयाचे जीणे जगावे लागते.

पुन्हां गोपा कामाला लागतो. कुणी एखादेवेळी जरा बस म्हटलं तरी बसत नाही. कुठे काम नसले तरी खांबाभोवती फिरे पण कामाच्या दिवसात गोपाला सगळीकडे रोजगार मिळे. तो जातीने मांग असला तरी प्रामाणिक आहे. कुणाचं काही उचलत नाही, कुणाशी भांडण नाही, कुणाची चोरी नाही. असा हा गोपा आपल्या मनात ठसून जातो.

पावसाळयात त्याला रोजगार मिळत नाही. भाकरीची टंचाई पडते. त्याच्या शेतातही कांही नसते. घरात धान्यावाचून भाकरी खोळंबते म्हणून उठतो. दोरी, विळा घेतो, कुणाला तासभर गवत कापू लागतो. त्यातून त्याला दहा-बारा पेंढया मिळतात. पायाने अधु असल्याने सारखा पडतो. असा हा गोपा आपणास दिसतो.

पोटासाठी अगतिक झालेल्या गोपाला त्याच्या पोराबद्दल विचारले तर एकदम शहारे आणण्यासारखे .... तो म्हणतो -

"पॉर मेलं मालक, परवादिवशीच तुम्ही दिलेल्या मक्याच्या कण्या त्येनं हूं म्हणून भुकंच्या पोटी खाल्या नि मक्कं पोटात फुगून पॉट बोदागत झालं. कसबसं मग एकदीस जगलं".

"मग कसा येशील तू कामाला? "

"त्येला काय हुतंय? पोटाच्या पाठी लागून ते मेलं. आम्हीबी असंच एक दीस आड मातीआड व्हायचं पॉट पॉट करत।" (पृष्ठ 182).

मुलाचं मरण सहजतेनं सांगणारा गोपा आपल्याला दिसतो इतका हा माणूस दारिद्रयाने पिचला आहे.

हा गोपा जगण्यासाठी संघर्ष करताना दिसत नाही. येईल त्या प्रसंगाला तोंड देताना दिसतो. असे हे गोपासारखे व्यक्तिचित्र यादव चित्रित करतात.

वेडाच्या लहरीत काहीतरी बडबडणारा 'खुळा इठू" हा जातीने धनगर आहे. मेंढरे घेऊन शेतात जातो. तिथे तो प्रामाणिकपणे काम करतो. कुणाला बोलत नाही. मेंढराच्या भोवती छपाटी

घेऊन फिरतो. त्यावेळी तो 'सुंबरानं मांडिलं' चं गीत म्हणतो. इठूच्या भावाचाही बगा शेतात असतो. त्याची वहिणी बायना शेतात भाकरी घेऊन येते. लांब गेलेले एखादे मेंढरू परतून आणते. पांडाचं जेवण झालं, बायनानं शेण गोळा केलं आणि इठूला उचलू लाग म्हटले. उचलून दिले पण तिला मारले. ती ओरडली आणि नव-याकडे पळाली. पांडाने मानगुटीवर दोन दणके दिले हातपाय जोराने झटकू लागला.

वाटेवर कोणी दिसले तरी त्याला बडबडत राहायचा. धनगरवाडयात इठूचं घर आहे. त्याने जळणाला आग लावली आणि मोठयानं बडबडत राहिला. बायकोच्यासमोर ही घाण खा म्हणून टाकून दिली. असा हा इठू संशयाने पछाडलेला आहे. घरात कोणी नाही सर्वजण सूत कातायला गेले होते. मुलगा त्याच्याजवळ ठेवला होता. त्याने त्या छरीतच मुलाला घेऊन लांब सोडून तो आला. हे सर्व पाहिले आणि बायका रडू लागल्या, आक्रोश करू लागल्या. एका म्हाताऱ्याने त्या मुलाला आणले. मुलगा सापडला म्हणून भिवराच्या नशिबाचं सर्वजण कौतुक करत राहिले.

"शिव-या तिडा : ऽऽ क् धिन। बायकू तिडाऽऽक् धिन । संसार तिडाऽऽक् धिन। कोण कुणाचं ? गाडगी मातीची। चकार कुंभाराचं। .... माझ्या घरात येऊन बसल्यात ... आरं चाऽऽल। संसार कुणाचा ? बायकू कुणाची ? .....पॉर कुणाचं? झुक झुकाड क् झयाऽक। कोण हाय कुणाचं? आरं चाऽल ". (पृष्ठ 169)

असा हा संशयाने पछाडलेला इठू आपणास दिसतो.

**"उखडलेली झाडे "** :-

"उखडलेली झाडे" या कथासंग्रहात अगदी पहिल्याच पानावर "झाडासाठी चार शब्द " लिहले आहेत.

खेडयातील माणसे शांत, शितल आहेत. आपली संपूर्ण दुःखे सोसत आलेली. जशी झाडांची मुळे मातीत घट्ट रोवून उभी असतात तशी.

त्यांच्या संघटना नाहीत, त्यांच्याजवळ शस्त्रे नाहीत, सत्ता नाही; ती फक्त शेती पिकवून हजारो हातांनी देत असतात आणि मलूल झाडासारखी माणसे येथे असतात.

झाडे ही तोडली जातात शहरांच्या सजावटीसाठी, फर्निचरसाठी, नवीन-नवीन व्यासपीठे स्थापन करण्यासाठी. धरणांमुळे खेडी पाण्याखाली जातात. त्यांची जी संस्कृति आहे. त्या संस्कृतीचे संदर्भ पुसले जातात.

तसा मानवी समाजसुध्दा (कष्ट करणा-यांचा, श्रमणा-यांचा) झाडासारखा वापरला जातो. त्यांची झीज होते. आणि उखडलेल्या झाडासारखी ही माणसे उखडून जातात, नष्ट होऊन जातात.

"जन्माला आला-गेला आणि वहाता वहाता गेला".

अशी ही माणसे मन सुन्न करून टाकणारी वाटतात.

आनंद यादव हे एक श्रेष्ठ दर्जाचे, साहित्यातील ग्रामीणतेचा विकास करणारे व आजच्या नवोदित कथालेखकांना यशस्वीतेकडे वाटचाल करण्यास प्रवृत्त करणारे लेखक आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

यादवांनी ख-या अर्थाने 1965 पासून कथालेखनास सुरूवात केली असली तरी यापूर्वीही त्यांनी ग्रामीण लेखन केले आहे. अनेकदा त्यांच्या लेखनातून ग्रामीण भागातील लोकांच्यावर अन्याय कसा होतो. तेथील वातावरण कसे आहे, तेथील व्यक्ती या अन्यायाखाली दबलेल्या- पिचलेल्या, दु:खी-कष्टी आहेत. याचाच प्रामुख्याने त्यांनी आपल्या लेखनात विचार केला आहे.

आनंद यादवांच्या 'उखडलेली झाडे' या कथासंग्रहातील कथांचा विकास कसकसा होत गेला हे पहाणे अत्यंत आवश्यक आहे. त्यातून त्यांच्या प्रगल्भ होत गेलेल्या विचारांची जाणीव आपल्याला होते.

"उखडलेली झाडे" च्या मलपृष्ठावर यादवांनी म्हंटले आहे.

"ग्रामीण भागातील वास्तव काय आहे. तेथील समाज मनाचे व शहर-खेडे यांच्या अनेक प्रकारच्या संबंधाचे चित्रण प्रखर आणि मर्मभेदी झाले आहे"

त्यांच्या अनेक कथा या वास्तविक, सत्य असल्यातरी त्या कथांचा कल्पनेचा साज चढवून अनेकदा त्या मनोरंजक

करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. आता प्रत्येक कथा वेगळी कशी आहे हे पाहू.

या कथासंग्रहातील पहिलीच कथा म्हणजे 'गावचा मुख्यमंत्री' होय. या कथेतील महत्वाची पात्रे म्हणजे बाळासाहेब भुजबळ, धोंडीबा पवार, मास्तर व छ-या ही होत. याचबरोबर त्यात इतर पात्रे आहेत. पण ती काही प्रमाणात कथेतून अवतरताना दिसतात. ज्यांच्याभोवती ही कथा गुंफते तो छ-या होय. याच छ-याच्या भोवती कथा फिरते आणि त्यापाठोपाठ बाळासाहेब भुजबळ हे यातील मुख्य पात्र होय.

हे एक अद्यावत समाजमनाचे वास्तव आहे. लोकशाही आपल्या देशात रूजत चालली आहे. त्या लोकशाहीची मुल्ये निरक्षर म्हणजेच आडाणी माणसाला एकाचवेळी कळणे शक्य नाही म्हणून ग्रामीण भागातील बदलत जाणा-या समाजमनाचे दर्शन त्यांनी घडविले आहे.

काटेगाव हे प्रसिध्द आमदार बाळासाहेब भुजबळ यांचे गाव म्हणून ओळखतात पण तेथील मुख्यमंत्री हा वेगळाच आहे. तो म्हणजे शरद धोंडिबा पवार. त्यांना लहानपणापासूनच सर्वच छ-या म्हणत असत,म्हणून शरद पवार हा गावचा छ-याच असतो.

शरद पवार महाराष्ट्राचे दीर्घकाळ मुख्यमंत्री राहिले. काटेगावचाही शरद पवार राजकारणाची आवड असणारा म्हणून त्याला लोक मुख्यमंत्री म्हणू लागले त्यात कुणाची अवहेलना करण्याचा भाग नाही. यात अल्पकुवतीची दरिद्री, राजकारणाची हौस असणारी गामीण माणसे पहावयास मिळतात. त्यातलाच एक छ-या आनंद यादवांना सापडला. राजकारणात रस घेणारा छ-या आणि लोकशाहीतील नागरिकांच्या अंगी सार्वजनिक शिस्त, चिकाटी, सहकार्य, देशप्रेम , सहिष्णूता हे गुण असावेत अशी अपेक्षा असते. त्याला राजकारणाची अपार हौस आहे. हा छ-या म्हणजे पु.ल.देशपांडेंच्या 'व्यक्ती आणि वल्ली' मधील नारायणासारखा निर्मत्सरी आहे. म्हणून तर आपला लंगोटी यार भुजबळ आपणच आहोत असे समजून तो निवडणूकीच्या धामधुमीत वावरताना दिसतो. असा हा छ-या लोकांच्या कौतुकाचा विषय झाला होता. आनंद यादवांनी या कौतुकाच्या मागे असणारे कारूण्य आणि विषम समाज रचनेची विदारक दृष्टी या कथेतून

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मांडण्याचा समर्थपणे प्रयत्न केला आहे. सहकार्य करण्याची प्रवृत्ती आहे म्हणूनच तो बाळासाहेब भुजबळ यांच्या घरी जातो. देशाविषयी प्रेम आहे म्हणूनच तो हे काम करतो. त्यातूनच त्याला राजकारणाचे धागे दोरे समजतात व गावचे लोक शरद पवार यांना गावचा मुख्यमंत्री समजतात.

या कथेतील रचना अभ्यासली तर छ-या याच्याच परिस्थितीचा विचार करावा लागतो. तो खेडयातील अल्पभूधारक व शेतमजुरांचाच प्रतिनिधी आहे. दारिद्र्य रेषेखालील समाज खेडयातून पसरला आहे असे आपण म्हणतो. त्याचा तो प्रतिनिधी आहे . या मजुरांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. ती किती आणि कशी बदलणार? येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांची आठवण सांगावीशी वाटते.

> "सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेजच्या स्थापनेच्या वेळी भाऊराव पाटील यांनी आपली कार्यकर्ती मंडळी रेठरे या गावी पाठवली. तेथे गाडगे महाराज कॉलेजसाठी वर्गणी मागितली त्यावेळी तेथील सधन शेतक-याने उत्तर दिले. तुमच्या कॉलेजमध्ये शिकणा-या मुलांना मदत करून आमच्या पायावर धोंडा पाडून घेऊ इच्छित नाही. दीन दुबळयांची पोरं शिकली तर आमच्या गोठयातलं शेण कोण उचलणार? त्याच गावात भाऊराव पाटील पावसात गेले व हरिजन वाडयातून आठ आण्याची वर्गणी घेऊन आले".

या एका आठवणीमध्ये जे चित्रण दिसते त्याचाच विचार आनंद यादवांनी 'मुख्यमंत्री' या कथेत केला आहे. महाराष्ट्राच्या परिवर्तन पर्वातील जे छोटे-मोठे संघर्ष आहेत त्याचे चित्रण छ-याच्या निमित्ताने या कथेत केले आहे. शरद शाळेतून येऊन उंब-यावर बसला आहे आणि आईला चहा मागतो. आई सांगते की, घरात चहा-पावडर नाही. थोडा वेळ थांब. वडील घेऊन येतील. तेवढयात त्याला बाळासाहेब भुजबळाचा नोकर निवडणूक प्रचारासाठी बोलावण्यास येतो. छ-या जाण्यास तयार नसतो पण भुजबळाचा नोकर एक कप चहा मिळेल व उरले-सुरले खायला मिळेल हे सांगतो, मग तो चटदिशी उठतो व भुजबळाच्या वाडयावर जातो.

शाळेत जाताना जे कपडे घेतले होते तेच कपडे पुन्हां त्याच्या वाढदिवशी घालतो.

बाळासाहेब भुजबळ याच्याबरोबर एकाच गल्लीत बालपण गेले. त्याच्याबरोबर खेळला,

एवढेच नव्हे तर तिसरीपर्यंत दोघे एकाच वर्गात होते. त्यावेळी परीक्षेत शरदरावांचं बघून बाळासाहेबांनी पाटीवर उतरले होते. त्यामुळे ते तिसरीतून चौथीत गेले.

बाळासाहेब भुजबळ याची परिस्थिती चांगली होती म्हणूनच भुजबळ पुढे गेला व छ-या शेतमजूर तो शेतमजूरच राहिला. त्या लोकांना दुस-यांच्या मुलाने शिक्षण घेऊ नये. शिक्षण घेऊन काय करणार? त्यांची चाकरी कोण करणार? हा कर्मवीरांच्याच आठवणीसारखा, हा प्रसंग झाला आणि जर शरदची परिस्थिती चांगली असती तर एक कप चहासाठी निवडणूकीत गेला नसता, शिक्षणासाठी पाठीमागे राहिला नसता, बाळासाहेब भुजबळाचा प्रचार केला नसता. ग्रामीण जीवनातील अगतिकता या कथेत पहावयास मिळते यातून समाजमनाचे दर्शन घडते.

> प्रत्येक आमदार व्यासपीठावर उभा राहिला की, आश्वासनं देतो -
>
> "गोरगरिबांसाठी सरकार राहायला घर बांधून देणार आहे. देशातील गरिबी हटवणार आहे". (पृष्ठ 5)

हे सर्व म्हणायचे, मते मागायची पण प्रत्यक्षात कार्य काहीच नाही. यातूनही समाजमनाचे दर्शन घडते यातील हे वर्णन पहा -

> "आणि माझ्या लोकशाहीला एक नऊवारी नवं लुगडं घेईन. एकदा तरी तिची लाज झाकून तिला नटवावी म्हणतो, अगदी इंदीरा गांधीगत नटवायचा इचार हाय". (पृष्ठ 11)

यातून लोकशाहीचे विडंबन कसे चालले आहे हेच जाणवते. असे असूनसुध्दा गावचा मुख्यमंत्री या कथेतील माणसे दारिद्रयाने पिचलेली दुःखी-कष्टी असली, तरी आहे त्या परिस्थितीत निर्मळपणाने आनंदाने राहतात.

यातील दुसरी कथा म्हणजे "भोबळ" होय. या कथेतील महत्वाचे पात्र म्हणजे रावसाहेब आहे. रावसाहेब हा कथेचा नायक असतो. गावामध्ये शिकलेला तरूण म्हणून त्याचा नावलौकिक असतो. त्याच्याबरोबर दुसरे महत्वाचे पात्र म्हणजे स्येंदया होय. आणखी काही पात्रे आहेत पण ती कल्पनेने रंगविलेली.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

पूर्वीच्या काळी खेडेगावात जाण्यास गाडी नसायची, पायीच चालत जावे लागे.. पण काही दिवसांनी परिस्थिती बदलली व गावातून एखादी गाडी जाऊ लागली. त्यामुळे माणसं पायी चालत जाण्यास जयार नसत म्हणून हे वर्णन पहा -

> "सगळी पकडलेली वांडरं पिंज-यातून कुठल्यातरी जंगलात सोडून द्यावीत तशी कडगावची माणसं एस्. टी. तून उतरली आणि त्याच एस्.टी.तून उतरला तो कथेचा नायक रावसाब". (पृष्ठ 12)

एवढा शिकलेला पण नोकरी नाही. आज जसे शिक्षण महाग झाले आहे तशी नोकरीही महाग झाली आहे . गरिबांनी तर नोकरीसाठी धडपडू नये अशी अवस्था झाली. त्यात घरातील आई-वडील, बहिण-भावंडे यांचे समाधान कां तर आपला मुलगा शिकला म्हणजे साहेब होणार या आशेवर माणसे जगतात. शेवटी नोकरी म्हणजे पैसा, जगण्यासाठी पैसा आवश्यक आहे. शिकल्यामुळे दारिद्रयातून बाहेर पडता येते याची जाणीव झाली. पांढरपेशा लोकांचं जगणं हे कमी कष्टाचे असते हे कळू लागले. अनंतविश्व दारिद्रय भोगणा-या लोकांना शिक्षणाचे महत्व कळू लागले. माणसं शिकून पांढरपेशी तयार झाली. त्याला जबाबदार कोण शिक्षक की शाळा सुरू करणारे सरकार? त्यामुळे आडाणी-कष्टकरी असणारा समाज एकाच पिढीला कष्ट घेऊ व आपणही पांढरपेशांसारखं कष्टविरहीत सुख घेऊ अशी स्वप्ने बघत राहिला. परिस्थिती मात्र प्रचंड गतीने बदलत गेली. समाजात बेकारी वाढली. शिकून तयार झालेल्या बेकार तरूणांना नियमितपणे ठराविक काळात उत्पन्न देणा-या नोक-या मिळेनाशा झाल्या. तरूण पिढी निराशेच्या गर्तेत सापडली. याला जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न ही कथा वाचताना निर्माण होतात जशी कथानायकाला भोवळ येते तशी आपणालाही येते.

> "समाजातील खालच्या थरापर्यंत शिक्षण गेलं पाहिजे". (पृष्ठ 14)

असे म्हणायचे पण प्रत्येकाला नोकरी मिळाली पाहिजे असे कोणीही म्हणत नाही. मात्र मंत्री, आमदार यांच्यातील लोकांना नोक-या तयार. आता हेच बघा ना। –

"गावात संडास नाही. संडासासाठी विटा, सिमेंट सर्व काही आणलेलं असतं. पण संडास बांधायचे राहते बाजूला त्या अगोदर सरपंचाचे घर बांधून तयार असते". (पृष्ठ 15)

गावपातळीपासून तयार झालेला हा भ्रष्टाचाराचा नमूना देशपातळीपर्यंत आपणास अनुभवास येतो याचे चित्रण यादवांनी या कथेत केले आहे.

आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे नुसते शिक्षण घेऊन उपयोगाचे नाही तर शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा. ग्रामीण साहित्यात फुले, आंबेडकर यांनी जे सांगितले त्याची प्रचिती या कथेत येते.

आई-बहिणीने दिवस रात्र कष्ट करून शिक्षणासाठी पैसा दिला. शिक्षण घेतले पण नोकरी नाही. शेतात कष्ट करू देत नाहीत ही सर्व परिस्थिती पाहिली तर कथेचा नायक रावसाब याच्या मनात भोवरा निर्माण झाला. जिथे डोह असतो. तिथे भोवरा निर्माण होतो. हा डोह दुःखाचा डोह. या एकेका प्रसंगाचा खड्डा पडेल तसा डोह निर्माण होतो असे ही कथा वाचून जाणवते.

राजकारण हा अटळ भाग आहे, लोकशाही ही जीवनप्रणाली आहे; त्यामुळे त्यात राजकारणाचा भाग आलाच.

या कथेचा शेवट अगदी विलक्षण असा झाला आहे. ती कथा जिथे संपते तिथेच ती आपल्या मनात सुरू होते. इतकी परिणामकारकता यादवांनी अखेरच्या प्रसंगात मांडली आहे . ते म्हणतात

"परडयात अचानक इरागतीला आलेल्या टोक-याच्या म्हातारीला ते दिसलं नि ती गल्लीतल्या माणसांना हाका मारत तिकडं धावली. जवळ गेल्यावर तिच्या ध्यानात आलं की आपल्या उकीरडयावरचं शेण वाया गेलंय". (पृष्ठ 20)

यातून चार्ली चाप्लीन ची आठवण होते.

यातील तिसरी कथा म्हणजे "कष्टाची लक्ष्मी" होय. समाजातील विषमतेचे विदारक दर्शन घडविणारी कथा म्हणून याकडे पहाता येईल. त्यातील महत्वाचे पात्र म्हणजे गंगारामची बायको होय. तिची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. दोन वेळ पोटभर खायलासुध्दा मिळत नाही. असे गंगारामच्या बायकोचे कुटुंब याबरोबरच जी अनेक पात्रे आहेत ती म्हणजे साताप्पा कदम, सगुणा, द्रुपदी, गोंदा इ. होत.

गावापासून लांबवर असलेल्या शहरातील गल्लीबोळं पालथी घालून कच-यातून सापडतील ते प्लॅस्टीक, डबे, पत्रे, चपला गोळा करायचे आणि ते नेऊन विकायचे . मिळणा-या त्या पैशानं घर चालवायचं या सर्व परिस्थितीला कंटाळूनच गंगारामने विहीरीत उडी घेऊन जीव दिला. पण त्याच्या बायकोला मात्र तसे करून चालणार नाही. कारण सगुणा, दुरपा व गोंदा साठी तरी तिला जगलं पाहिजे.

तोंडावर आलेला दिवाळी सण कशाप्रकारे साजरा करावयाचा याची फक्त कल्पना करण्यापलिकडे गंगारामची बायको काहीच करू शकत नव्हती. प्लॅस्टीक, बाटल्या विकून 8-10 रूपये येतील ही निव्वळ कल्पनाच ती करू शकत होती . पण कल्पना प्रत्यक्षात अवतरणं कठीण होतं हे त्या गंगारामच्या बायकोचं दुर्दैव।

श्रीमंताघरी रोजचीच दिवाळी पण गरिबा घरी वर्षातून एखाद्या दिवशी येणारी दिवाळी कशी साजरी करायची याचीच चिंता.

> "गावात हळुहळु पैल्यांदा इंजीनं आली मग तिच्या माळावरनंच विजेचे डांब गेले. वाडीत विजेचे दिवे लुकलुकु लागले. एक डांब तिच्या खोपटाच्या मागंच खोल खडडा खणून कायमचा रोवलेला. हातात विजेच्या जळत्या तारा धरून मुकाट उभा . कुणीकुणी आपल्या शेतावर त्यातल्याच तारा नेल्या नि होत्या त्या मोटा बंद पडून पंप आले. साताप्पा कदमानं एक छोटा ट्रॅक्टर आणला नि वाडीची बैलं दोन-तीन वर्षात मोडीत निघाली. गायरा-म्हसराबरोबर भाकड जनावरासारखी पावसाळयात चरायला माळावर येऊ लागली. मिरगाचं गार वारं सुटेल तसं कायमचं डोळं मिटू लागली. रात्रंदिवस ट्रॅक्टरचा आवाज सगळया कदमवाडीच्या अंगातनं देवरसणीसारखा घुमू लागला. नांगर, कुळव रानाला मुकले नि जळणाच्या ढिगात जाऊन पडले. मोठया गाडयांचा आवाज गडप झाला". (पृष्ठ 23)

हे वर्णन जसजसे पुढे वाचत जाऊ तसतसे समाजातील विदारकतेचे भिषण दृश्य दिसू लागते. आजचे युग हे विज्ञान युग असल्यामुळे विज्ञानाच्या प्रगतीप्रमाणे नांगर, मोटा काळाच्या ओघात जाऊन त्याठिकाणी ट्रॅक्टर आला.

गायी म्हशीबरोबर शेती पिकवणारे बैलंही शेतात चरायला येऊ लागले. अशा परिस्थितीत गंगारामला काम मिळेना म्हणून त्याने विहीरीत उडी टाकून जीव दिला. नव-याच्या मागे प्राप्त जीवनाला ती कंटाळली. मात्र मातृत्वामुळे कष्टाचे जीणेसुध्दा तिने पसंत केले. दिवसभर शहरातील प्लॅस्टीकच्या व काचेच्या वस्तू गोळा करून आपले जीवन जगत होती. पण मुलांसाठी जीवनही जगण्याचं धैर्य तिनं आपल्यात निर्माण केलं होतं. ती म्हणते -

> "बरं, केलंसा जीवाचं कडासनं घालवून सोनं झालासा पण मी आता हितं काय करू? तुमच्या मागोमाग आली असती पण ह्या पोरांचं काय? (पृष्ठ 31)

गंगारामची बायको मिळणा-या वस्तुच्या विक्रीतून पैशाने घर चालवते आणि त्यातूनच पै-पै करून साठवलेल्या पैशातून शिंदीची वाळकी पाने आणून कष्ट करून लक्ष्मी तयार केली व शहरात विकण्यासाठी गेली. विक्रीतून मिळणा-या पैशानं दिवाळीचा सण साजरा करायचा. द्रुपदा, गोंदाची दिवाळी साजरी करायची इत्यादी स्वप्ने ती रंगवत होती. पण तिच्या दुर्दैवाने या आधुनिक जगात कोणीही लक्ष्मी घेण्यास तयार नव्हते. कारण याच लक्ष्मीच्या जागी लांब दांडयाचे साळुते आले होते. या कष्टाच्या लक्ष्मीला विकल्यानंतर येतील त्या पैशानं रवा, साखर, हरब-याची डाळ घेऊन गिरणीत बसून नीट करायचं व दळून त्याच्या चकल्या, शेव, लाडू बांधायचे हे सर्व ती कल्पनेत रंगवत होती पण कष्टाची लक्ष्मी काय विकली जात नव्हती. कारण या सुधारलेल्या युगात, शहरी समाजात लांब दांडयाचे झाडू आता वापरात येऊ लागले होते. एक बाई म्हणते -

> "नको - नको केरसुण्या आम्ही वापरत नाही असे लांब दांडयाचे झाडू लागतात आम्हाला. उभ्यानं झाडायला बरं पडतं". (पृष्ठ 28)

तिने जे कष्ट केले त्यामुळे तिला या पालटलेल्या जीवनाची माहिती नव्हती. तिने जे कष्ट केले त्या सर्व परिस्थितीमध्ये झालेला बदल लक्षात न घेता केले. काळाचे भान ठेवले नाही हे केवळ नशिबाने घडले नाही तर अज्ञानापोटी घडले.

श्रीमंतांनी रोज दिवाळी करून खायची व गरिबाला एकवेळ सुध्दा मिळू नये हे केवढे विदारक सत्य यातून दिसते.

या कथेत समाजातील अनेक प्रकारच्या माणसांची चित्रणे आली आहेत. दारिद्रयाने पिडलेली, दु:खी, कष्टी माणसे,मध्यमवर्गीयांची कुचंबना आणि त्यांचे अपरिहार्य ठरलेले हिशेबी जीवन. सुखाच्या धो-धो वहाणा-या प्रवाहात खेळणारी माणसे, शिक्षणाच्या नावाखाली स्वत:ला शिष्ट समजणा-या व्यक्ती अशा अनेक प्रकारच्या व्यक्तींचं व समाजाचं चित्र येथे दिसते. गंगारामची बायको कष्टाचे जीणे जगत होती ते पहाता तिच्या दु:खाला तोड नाही.

दिवाळीच्या मुहूर्तावर कष्टानं बांधलेली लक्ष्मी (साळुतं) कोणी घेण्यास तयार नाही. या साळुत्याला लक्ष्मी कां म्हणतात ते ही शहरातला पांढरपेशी समाज विसरून गेला. हा बदल होणं अटळ आहे. म्हणजे आपल्या परंपरेला चिकटून राहणा-या माणसाला जुनं ते सोनं म्हणून राहता येणार नाही लक्ष्मी घ्याऽऽऽ ओरडणा-या गंगारामच्या बायकोला लक्ष्मी म्हणजे काय असा प्रतिप्रश्न करणारी मंडळीही येथे दिसतात.

अशाप्रकारचे विद्वत्तेचे व सुशिक्षितपणाचा आव आणतात.

"असला काही भोळसटपणा आम्ही करत नाही व तू ही करत जाऊ नकोस. जुन्या चालिरीती सोडून दे। नि नवे विचार आत्मसात कर। खेडी सुधारली पाहिजेत".

या स्त्री मुक्तीवाल्या बायकांना वाटत असतं की आपण शिकून शहाण्या झालो. आपण समाजसेवा करायची व समाज शहाणा करायचा अशा प्रकारचे बोलणे ती बाई बोलत राहिली.

आनंद यादवांनी या आधुनिक काळात विज्ञानामुळे समाजात झालेले बदल व समाजातील व्यक्तींची मनं किती संकुचित झाली आहेत. याचे चित्रण अत्यंत उत्कटतेने व तरलतेने रंगविले आहे.

त्यानंतरची कथा म्हणजे 'फाटयाचं पाणी' ही होय. यातील महत्वाचे पात्र म्हणजे लक्षू आहे. त्यानंतर अनेक पात्रे आहेत ती म्हणजे गणू फाळके, हिंगेसाहेब होय. पण ही कथा ख-या अर्थाने लक्षू भोवतीच फिरते.

आनंद यादवांच्या कथेतून अवतरणारा परिसर हा कागल कोल्हापूरच्या आसपासचा परिसर आहे. त्यांच्या या कथेतून त्या परिसरातील भौगोलिकताच दृष्टीस पडत नाही तर त्या परिसरातील जत्रा-खेत्रा आणि त्याबरोबरच लोकाचाराचेच दर्शन घडते "फाटयाचं पाणी" या कथेतील वर्णन पहा -

> "लक्षूला सोडून (फाटयावर) एस्. टी. ओळख नसलेल्या माणसागत निघून गेली. मोटार रस्त्याला पाठमोरा होऊन तो गावाकडं जायला निघाला, उन्हाळयाचे दिवस. सगळा माळ उन्हानं धगधगत होता. त्याच्या झळा अंगाला चाटू लागल्या. चिटपाखरूही कुणीकडं दिसत नव्हतं. चारी बाजुंनी पसरलेला म्हसोबाचा जुना माळ. पीकं घरात आली की या माळावरच्या म्हसोबाची जत्रा होई. मार्गशिर्षाच्या शिवरात्रीला ती सुरू होई आणि अमावस्येचे नारळ फोडून ती संपे. जत्रा ही तीन दिवस चाले. नारळाबरोबरच जत्रा फुटली की माणसं गावोगाव जात. ती पुन्हा वर्षानं त्या माळावर येत. तोवर माळ सुना, भुंडाच दिसे. जत्रेत मात्र आसपासच्या पाच-सात गावाची माणसं येत आपलं कोंबडं आपल्याबरोबर आणत नि म्हसोबाला दान करत. सगळया माळभर वा-यानं पिसं उडत. चारशेभर कोंबडं तरी कापलं जाई. म्हसोबाची मूर्ती म्हणजे वटारलेल्या तांबडया लाल डोळयांचा काळाभोर पाषाण. माथ्यावर शेंदूर फासलेला. कधी काळी तटवणीच्या पुर्वजांनी त्या पाषाणाला देव करून बसवलेला. मग तो आपोआप पंचक्रोशीतनं मानगुटीवर बसवून घेतलेला. वर्षाला कोंबडया कोकराचा बळी मागणारा त्याच्या कृपनं सगळं चाललय अशी श्रध्दा ठेवून आसपासची गावं जगणारी". (पृष्ठ 34)

या वर्णनात गाव म्हटले की गावात जाण्यास गाडी नसे. फाटा असे . त्या फाटयावर गाडी थांबे व तेथून गावात चालत जावे लागे. तसाच लक्षू फाटयावर उतरला. उन्हाळयातील उन्हं आणि त्या उन्हाने धगधगणारा माळ तसाच त्या माळावरचा पंचक्रोशीतील लोकांचे तीर्थस्थान, श्रध्दास्थान असणारा म्हसोबाही आहे. प्रत्येक ठिकाणी कोणत्या तरी देवाची यात्रा भरते. तशीच जत्रा या गावात भरली. या जत्रेच्या काळात म्हसोबापुढे

फुटणारी नारळे तशीच कापली जाणारी कोंबडी आहे. याचा अर्थच आजही जत्रा आणि खेत्रा यांनी समाज जीवनाला वेढून टाकले आहे. वरील सर्व वर्णनातून समाजातील लोक अंधश्रध्देला बळी कशी पडतात हेच जाणवते.

लक्ष्मू हा सेवानिवृत्त सैनिक असतो. आपण सैनिक आहोत आपल्याकडून हिंगेसाहेबाने पैसे घेऊ नयेत असे वाटत असते. कारण सैनिक हा देशाचा कृतक आहे तो समाजाचा, देशाचा नागरिक आहे. त्यामुळे हिंगेसाहेब त्याच्याकडून पैसे घेणार नाही अशी त्याची श्रध्दा होती. त्या श्रध्देला तडा गेला. हिंगेसाहेब त्याच्याकडून पैसे मिळवतो. हा त्याच्यावर किती अन्याय होतो आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसुत्रींची वल्गना करतो याची प्रचिती आपणास येते का? हिंगेसाहेबानं त्याला फसवलं आणि त्याची गावातल्या लोकांनी टवाळकी केली असे हे टवाळखोर अधिकारी आहेत. त्याच्यासमोर हा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे हिंगेसाहेबाने सेवानिवृत्त माणसाकडून पैसे कसे घेतले?

लक्ष्मू कॅनॉलचं पाणी आपल्याला मिळावं म्हणून सतत प्रयत्न करतो. परंतु खालच्या पुढा-यापासून ते वरच्या अधिका-यापर्यंत सर्वत्र भ्रष्टाचारच दिसतो. या भ्रष्टाचारातील खाचाखोची आनंद यादवांनी विनोदी पध्दतीने मांडल्या आहेत.

लोकशाहीमधील सत्प्रवृत्त नोकरशाही बिघडत निघाली तर कोणता अनर्थ ओढवतो त्याचे चित्रण या कथेत खुसखुशीत विनोदी पध्दतीने केले आहे त्यामुळे ही कथा प्रभावी वाटते.

यानंतरची कथा म्हणजे "फळया आणि पारंब्या" होय. यातील महत्वाची पात्रे म्हणजे बाबासाहेब सुतखडे, दादासाहेब देशमुख व मुकुंदराव कुलकर्णी ही होत.

बाबासाहेब सुतखडे हे कोष्टी समाजातले, दादासाहेब देशमुख हे मराठा समाजातले व मुकुंदराव कुलकर्णी हे ब्राम्हण समाजातले आहेत.

बाबासाहेब सुतखडे हे नावारूपाला आलेले सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांचा कोष्टी समाज हा लहान आहे. बाबासाहेब हयात होते तोपर्यंत राजकारणाची सर्व सूत्रे बाबासाहेबांच्याकडेच होती.

पण बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर, गावातील कार्यकर्ती मंडळींना वाटत होतं की, राजकारणाची सर्व सूत्रे त्यांचा मुलगा बाबूरावकडे जातील. पण तो वयानी लहान आहे. नुकताच शिकलेला आणि एक-दोन वर्षाच त्याने राजकारणात प्रवेश केलेला त्यामुळे त्याला राजकारणातील ज्या खाचाखोची असतात. त्या जास्त समजणार नाहीत म्हणून राजकारणाची सर्व सूत्रे बाबूरावकडे न जाता दादासाहेब देशमुख यांच्याकडे जातात.

बाबासाहेब सुतखडे यांची पुण्यतिथी पंधरा दिवसावर आली ती कशी साजरी करायची हे ठरविण्यासाठी कार्यकर्त्यांची सभा रात्री नऊ वाजता दादासाहेब देशमुखांच्या वाडयावर होती. सहा-सात महिन्यावर राज्याच्या निवडणूका आल्या होत्या. त्यामुळं पुण्यतिथीची पावलं लवकर उचलायची होती. कारण दादासाहेबांना राजकारणाचा वारसा मिळाला होता. दादासाहेब हे मराठा समाजातले आहेत. मराठा समाज हा मोठा, त्यामुळे ते निवडणूकीला उभे राहिले तर निवडून येतील असे ब्राम्हण समाजातील असणारे मुकुंदराव कुलकर्णीयांना वाटत होते. आपली धार्मिकता नष्ट होईल कारण ते मुळचे वतनदार कुलकर्णी असतात आणि ते स्वतःला कॉंग्रेसचे कार्यकर्ते म्हणवून घेत म्हणून ते म्हणतात -

"अनेक मित्र भारतीय जनता पक्षाचे जिल्ह्याच्या ठिकाणी उद्योग व्यवसाय करणा-या माझ्या मुलाच्या उपयोगी पडणारी माणसं मीही जवळ केली आहेत. त्यांचा पक्षबिक्ष मी काही जाणत नाही माणसं म्हणून आम्ही जवळ आलेलो आहोत". (पृष्ठ 48)

फक्त तोंडावर गोड बोलायचे आणि राजकारणात पुढे येणा-याला मागे ओढायचे तसेच दादासाहेब देशमुख हा राजकारणाची आवड असणारा व त्यातील खाचाखोची माहित असणारा असल्यामुळे तो निश्चितच राजकारणात पुढे येईल. आपल्यापेक्षा वरचढ होईल आणि आपली धार्मिकता, आपली वतनदारी नष्ट होईल म्हणून तो राजकारणात विष कालवतो आणि त्या राजकारणाच्या चिरफळया उडवतो. असा हा ब्राम्हणवर्ग आपणाला समाजात दिसतो.

बाबासाहेब सुतखडे हे सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे त्यांचा रामपूर गावात मान होता. म्हणूनच -

> "गेल्या वर्षापासनं हा हॉल कायम गजबजलेला असे. आता फक्त छायाचित्र मध्यभागी लटकत होतं. भोवती प्रासंगिक फोटो वेगवेगळया सभातून घेतलेले, उद्‌घाटनाचा नारळ फोडतानाचे, वृक्षारोपन करतानाचे, साखर कारखान्यातल्या कार्यक्रमाचे ... अनेक फोटो. त्यातच नेहरूंचा हात पाठीवर असतानाचा मोठा करून घेतलेला फोटो उठुन दिसणारा".
>
> (पृष्ठ 48)

यातूनच बाबासाहेब हयात नसतानासुध्दा समाजाची त्यांच्यावर किती श्रध्दा होती हेच जाणवते.

या कथेतून राजकारणाचा वारसा बापाकडून मुलाकडे चालविला जातो. तो मुलाकडे न जाता दादासाहेब देशमुखांच्याकडे जातो. याच राजकारणाचे डाव-प्रतिडाव बाबासाहेबांचे पुतणे, दादासाहेब देशमुख व चुलते यांच्या घरातून चालत होते त्याचे प्रत्ययकारी चित्रण यादवांनी या कथेत केले आहे. राजकारणात जे चढ-उतार असतात त्याचा सखोलतेने वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

बाबासाहेबांच्या थोरल्या सूनबाई वहिणीसाहेब, शिकलेल्या आणि बुध्दीमान असतात. त्या हॉलमध्ये चालणारं राजकारण माजघरातून ऐकून समजून घेतात आणि जेवता जेवता त्या अचूक बोलतात. त्यामुळे बाबासाहेबांना त्यांच्या बोलण्याचा, रस घेण्याचा अभिमान वाटायचा.

कारण वहिनीसाहेब कोष्टी समाजातील असूनसुध्दा त्यांच्याकडे राजकारण समजून घेण्याची व त्यातील खाचाखोची समजून घेण्याची कुवत होती. स्त्रीया राजकारणात आल्या तर कोणतीही स्त्री राजकारणातील माणसे अचूक हेरतात. म्हणूनच वहिणीसाहेबांनी मुकुंदराव सारख्या दुष्ट माणसाला अचूक हेरलं. मुकुंदराव फटफटीचा कडकडाट करत निघुन गेल्यावर त्या स्वतःशीच पुटपुटल्या.

> "भूकंपच झाला. आता तो जिल्ह्याजिल्ह्यातून राज्यात जाईल. मग राज्याराज्यातून देशभर पसरेल, सगळयांनाच हादरवून टाकील...
>
> भेगा , चिरफळया, फळया करणारी ही नरकाची करवत कुठे-कुठे फिरते कुणास ठावूक।
>
> ' (पृष्ठ 63)

हे वरील वाक्य शब्दांच्या व्यंजनेमुळे परिणामकारक ठरले आहे.

या कथासंग्रहातील आणखी एक भावणारी कथा म्हणजे "आंघोळीचा दिवस" ही होय. त्यातील महत्वाची पात्रे म्हणजे कथेचा नायक, त्याची बायको शांतू , आण्णा, आई, वच्चू वहिणी, शिवा इत्यादी प्रमुख पात्रे आहेत. आणि त्या पात्रांचे स्वभावविशेषही कथेला उठावदारपणा आणतात. ज्याच्या भोवती ही कथा फिरते. तो कथेचा नायक व त्याची बायको शांता होय.

दिवाळी म्हटली की , न्हाऊ माखू घालणे, ओवाळणी, फराळ खाणे आलेच आणि सर्व पाहुणे मंडळी जमली की, दिवाळीची मजा औरच असते. दिवाळी दिवशी सर्वांचा गोंधळ उडतो. आता यातील हे वर्णनच पहा -

> "उठून गडबड करण्याची काहींच गरज नव्हती . आंघोळ करून, कशीबशी न्याहारी करून वर्कशॉपवर जायचं नव्हतं. कामगारांना ज्याच्यात्याच्या कामावर जुंपायचं नव्हतं, रविवारला धरून दिवाळीची तीन दिवसांची सुट्टी घेऊन गावाकडं आलो होतो. किंचित आळसलो होतो. जाग येऊनही पहाटेच्या गुंगीत, बाहेरच्या थंडीमुळं पांघरूणाची उब घेत पडून होतो." (पृष्ठ 64)

यात सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत शहरात सतत कामच असते. पाच मिनीट म्हटले तरी सवड नसते असे हे शहरी वातावरण पण खेडयात आल्यानंतर निवांतपणा मिळतो आणि त्यातच दिवाळीची सुट्टी काढून आल्यानंतर अगदीच घाई-गडबड करण्याची गरज नव्हती. शहरी आणि ग्रामीण जीवन कशाप्रकारचे असते हेच यातून समजते.

आईला सगळे नातेवाईक एकत्र जमल्यानंतर घर म्हणजे एक नंदनवनच वाटते. म्हणूनच दिवाळीला सर्वांना एकत्र बोलावले होते. सर्वांच्या आंघोळी झाल्यानंतर फराळ वगैरे करून कथेचा नायक हा शेतात चक्कर मारून यावी म्हणून जातो. जाताना पसारे वस्तीतनं जाण्यास आण्णा सांगतात. कारण एकाच जातकुळीतील असणारा शंक-या रात्री घरी आला की नाही हे पहायचे होते.

शंकरचे कुटुंब व अण्णांचे कुटुंब हे एकाच कुळीचे आहे. पण शंकर कष्टाचे जीणे जगू लागला. आण्णांची मुले शिकली. नोकरीला लागली, पैसा मिळाला त्यातून त्यांनी शेती घेतली. आपल्या

जातकुळीतील असणा-या शंकरला मात्र गडयासारखे राबवले. शिक्षणामुळे त्यांचे कुटुंब सुधारले मुलं नोकरीला लागली, उद्योग व्यवसाय करू लागली. शहरातला पैसा घरात येऊ लागला, राहणीमानात फरक पडला पण शंकर दिवसरात्र कष्ट करू लागला .

दिवाळीच्या दिवशी आपल्याच घरातील असणा-या शंकरला मात्र फराळाचे दिले नाही मग आंघोळीचं तर सोडाच. त्यातल्या त्यात दिवाळीची आंघोळ कशीतरी करायची. यातील हे वर्णन मनाला एकदम चटका लावून जाते.

"काय झाली की नाही आंघुळ? " मी

"आता हुईल की, फाळक्याच्या चावीला पाणी आल्यावर मग आम्हाला हातापाया पडून मिळतयं. न्हाईतर देवळा म्होरं जाऊनच आणावं लागलं असतं तिथं माणसं गिधाडासारखी पाण्यावर पडत्यात". त्याला उशीर झाल्यानं काळजी वाटत हुती.

"व्हय उशीर झालाय तर आजचा खाडा का करत न्हाईस? "

"खाडा करून पोटाला काय खायाचं मालक". (पृष्ठ 74)

म्हणजेच एकीकडे दिवाळीची मनसोक्त आंघोळ करणारे आण्णांचे सुखवस्तु कुटुंब व दुसरीकडे दिवाळीच्या दिवशी फक्त घरी आंघोळ त्यासाठी पाणीही दुस-याच्या चावीचं आणलेलं असा हा विरोधाभास याठिकाणी उभा राहतो.

आपण म्हणतो, ब्राम्हण वर्ग खालच्या वर्गाला कमी लेखतो, पण कसेल त्याची जमीन या कायद्यामुळे खेडयातील शेतक-याकडे जमिनी वाढल्या असा हा सधन शेतकरी गरिबाला गडयासारखे राबवून घेतो हे केवढे विदारक सत्य यातून जाणवते.

अशा या दोन संस्कृतीमधील भेद यादवांनी उत्तम रीतीने रेखाटला आहे.

शंकरसारख्या कष्ट करणा-या माणसाला कष्ट करून साखरेचा चहाही मिळत नाही पण आपल्या घरी मालक आलेला आहे. म्हणून चहा तरी पिऊन जावा म्हणतो मी आत्ताच पिऊन आलोय तेव्हा शंकर म्हणतो -

"असू दे तुमच्या संगतीनं आम्हास्नीतरी साख-याचा च्या मिळंल. सणाचा दीस. पाव्हणंच हाईसा नव्हं आमचं।" (पृष्ठ 75)

यातून शंकर हा नात्यागोत्याला किती जागतो हेच जाणवते.

आनंद यादवांनी एकीकडे कष्ट करून पोट भरणा-या कुटुंबाची संस्कृती आणि दुसरीकडे आण्णांच्या सुखवस्तू कुटुंबाची संस्कृती या दोन संस्कृती भिन्न प्रकारच्या कशा आहेत याचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण या कथेत केले आहेत.

यानंतरची कथा म्हणजे "चावीचं पाणी" ही होय. यातील महत्वाची पात्रे म्हणजे कृष्णा, नाथा कणिरे व कृष्णाची आई आकण्याक्का ही आहेत

"चावीचं पाणी" या कथेचा नायक कृष्णा हा बी.कॉम. झालेला आहे. बी.कॉम झाल्यावर आईने सगळया गावाला पेढे वाटले आणि कळलं की कृष्णा बी. कॉम. झाला.

कृष्णा शिकलेला असल्यामुळे सर्व गाव त्याला नोकरी लागली का न्हाई असे विचारत होते. त्यामुळे त्याला घरातून बाहेर सुध्दा पडावे वाटत नव्हते.

वर्षभर नोकरीसाठी अर्ज खरडून सुध्दा नोकरी मिळत नव्हती. कारण पैसा असेल तर नोकरी लगेच पण कृष्णा शिकूनसुध्दा त्याचेजवळ पैसा नसल्यामुळं नोकरी कोण देणार? त्यावेळी मागील 'भोवळ' कथेची आठवण येते.

गावाला पाणी नव्हतं. इनामदाराची एक विहीर होती. तेथून सगळया गावाला पाणी आणावं लागे. खेडयातील जनतेचे कल्याण करायला म्हणून आलेली योजना गावातील सरपंचाने राबविली व गावात पाणी सोडायला, पाणीपट्टी वसूल करायला माणूस पाहिजे होता. कृष्णाच्या लांबच्या नात्यागोत्यातलाच सरपंच असणारा, त्याचे पाय कृष्णाने नोकरी द्या म्हणून धरले, तरीही तो लक्ष देण्यास तयार होईना. काहीतरी निमित्त सांगायला लागला व शेवटी म्हणाला.

"त्या जागेसाठी लई भाव पडलाय. गणगोतातलाच पडतोयस; तर तुला थोडी सुट देतो तू तेराशे दे." (पृष्ठ 78)

असा हा सरपंच कृष्णाच्या नात्यागोत्यातलाच असूनसुध्दा त्याच्याकडून पैसे मागतो म्हणजेच लाच दिल्यानंतरच त्याला नोकरी मिळणार होती.

एवढं शिकून तोही रोजगा-याच झाला होता. कामाला गडी सांगताना मळेकरी त्याला वगळायचा. "मास्तरला ते जमायचं नाही" कारण त्याला सर्वजण शिकल्यामुळे मास्तर म्हणायचे .

शेजारचे भाऊबंद नोकरी नव्हती म्हणून अधूनमधून वेंगळत होती. कुणाचे नाव न घेता टोचून बोलत होती . तरीही कृष्णा गप्प बसत होता. आपणास कुठेतरी या नात्यागोत्याचा उपयोग होईल म्हणून जाता येता 'काय तात्या' म्हणून बोलवत होता.

गावात तात्याने घर बांधायला काढले आणि पाणी जास्त लागेल म्हणून चाव्या घेतल्या. चावीचं पाणी धो-धो वहात असे. उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे रात्रभर झोप कृष्णाला आली नव्हती. आईने पाण्याच्या चार खेपा आणण्यासाठी उठवले. पण सगळं आवरेतोपर्यंत नाथातात्याच्या चावीला पाणी आले. तो एवढया लांब कुठे जायचे म्हणून तात्याच्या चावीला पाणी भरायला गेला. त्याला पाणी भरू देईनात. पूर्वीची परिस्थिती विसरून पांढरपेशी झालेली ही माणसं स्वतःच्या भाऊबंदातलाच असणारा कृष्णा आपल्या चावीचं पाणी नेतोय म्हणून त्याला हाकलून लावतात.

श्रीमंत असणा-या तात्यांचा मुलगा राजा याच्या हातात पैसा होता म्हणून त्याला शिक्षणाचे महत्व वाटत नव्हते. पण कृष्णाला त्याची जाणीव होती. आपण शिकलो तर आपल्याला नोकरी मिळेल. घरात पैसा नसतानासुध्दा हा कोल्हापूरला जाऊन शिकला म्हणून कृष्णाबद्दल राजाच्या मनात द्वेष होता. त्याचा राग त्याने पाणी नेताना काढला.

कोल्हापूरला वसंताच्या वडिलांकडे जातो. त्यांनी त्याला नोकरी मिळवून देतो असे सांगितले होते. विजबोर्डात मिटर रीडरच्या जागा भरायच्या होत्या. त्यासाठी सतराशे रूपये भरून नोकरी मिळणार होती. सरकारी नोकरी असल्यामुळं त्याच्या जन्माचं कल्याण होणार होतं म्हणून पैसे द्यायचे ठरवतो आणि जेवताना आईला म्हणतो -

SHIVAJI UNIVERSITY * KOLHAPUR *

"कायबी झालं तरी पैसे भरले पायजेत. एकदा नोकरी लागली की वरीसभरात पडलेला खड्डा भरून निघंल पुन्ना सगळं रांकला लागंल". (पृष्ठ 83)

सगळं समजून सांगीतलं नि एकुलती एक दुभती म्हैस विकायचं ठरवलं.

म्हैस विकली व बाराशे रूपये भरले आणि सातव्या म्हैन्यात नोकरी मिळाली. चार-पाच महिन्यांनी येऊन घरात चावी घेतली व नोकरीला निघून गेला.

वर्षभरानं आल्यावर परडयात चावी नाही म्हटल्यावर संतापतो तेव्हा आई म्हणते -

"घरात बसून पाणी पिऊन काय करू? धा वर्स ती चावी वापरली तर हे घर इकून पैसं भरावं लागतील. परवडलं तरी पायजे". (पृष्ठ 86)

शेवटी सर्व परिस्थितीचा विचार केल्यावर वाटू लागते की आईने केले तेच बरोबर आहे. गावातल्या कुठल्याच रोजगा-याच्या नशिबात चावी नाही तर आईच्या नशिबी कसे असणार? एका सुशिक्षित असणा-या मनाचे **विचार** लेखकाने व्यक्त केले आहेत.

नंतरची कथा म्हणजे 'सत्काराचा नारळ' होय. यातील महत्वाची पात्रे म्हणजे रेवणकुंभार हा या कथेचा नायक आहे. त्याच्या जोडीला दुसरे महत्वाचे पात्र म्हणजे बाळासाहेब. यानंतर अनेक पात्रे आहेत पण ती दुय्यम प्रतीची.

या कथेतील नायक रेवण कुंभार हा एक कारागिर असतो म्हणून बाळासाहेब रेवणला बोलवावयास येतो. त्यामुळे रेवणच्या आईला संशय येतो. आणि ती जाऊ नको म्हणते कारण बाळासाहेब दुष्ट प्रवृत्तीचा आहे. त्याच्यावर अनेक आरोप होते. त्यामुळे खालच्या कोर्टात जन्मठेपेची शिक्षा झाली होती पण हायकोर्टात तो निर्दोष सुटला होता. तो बाबासाहेबांसारख्या श्रीमंतांचा मुलगा होता. त्याच्याजवळ पैसा होता.

आईचे न ऐकता तो गेला. बैठक चालू होती. त्याचे स्वागत केलं. तो दोस्तीला जागला होता. बाळासाहेबाने गणेशोत्सवासाठी गणपतीची मोठी मूर्ती करण्याचे काम त्याच्याकडे दिले होते. त्यासाठी दीडशे रूपये अॅडव्हान्सही दिले होते.

त्याच्याजवळ कला होती, शिक्षण होते. पण नोकरीसाठी इंटरव्हयूला जाण्यास पैसा नव्हता त्यापेक्षा हे काम बरे म्हणून त्याने काम हातात घेतले. रेवण कुंभाराबद्दल बाळासाहेब म्हणतो -

'गावातल्या कलावन्ताला वाव द्यायचा आहे. आपल्या गावात एक झाकले माणिक आहेत. येत्या पाच वर्षात सबंध तालुक्यात नाव मिळवेल अशी रेवण कुंभाराकडं मूर्तिकला आहे. गावच्या कुंभाराचा धंदा प्लॅस्टिकवाल्यांनी खाऊन टाकलाय. अशावेळी रेवणच्या कलेला प्रोत्साहन देऊन सावरलं पाहिजे. त्यासाठी जास्तीत जास्त वर्गणी द्या, आपल्याच गावात आपलाच पैसा जातो आहे." (पृष्ठ 90)

आपल्या गावात कलावंत आहे त्याला वाव द्यायचा असे बाळासाहेब तोंडावर म्हणतो आणि लोकांकडून रेवणच्या नावाखाली वर्गणी उकळतो. पण रेवणला वाटत असते की बाळासाहेब हा आपला वर्गमित्र आहे. तो मित्रत्वाला जागेल आणि तो आपल्याला कायमचे काम देईल. तरीही एका गरीब मित्राची चेष्टाच तो करत नाही ना? असेही त्याला वाटते.

रेवणसारख्या कलाकाराला हरब-याच्या झाडावर चढवून खाली कसे ओढायचे हेच बाळासाहेब पहात होता. त्यामुळे रेवणसारख्या कारागिराचा उपयोग कशाप्रकारे केला जातो याची क्रूर चेष्टा करणारा धोरणी बाळासाहेब यादवांनी चितारला आहे. रेवणकुंभार हा कारू संस्कृतीत बसणारा. एकीकडे तुकाम्मा सारखा चपला बनवणारा चांभार आणि दुसरीकडे रेवण कुंभारासारखा कारागीर यादवांनी रेखाटला आहे.

यातील सर्व माणसे अडाणी नाहीत. पण आपल्यापेक्षा कारागिर असणारा रेवणकुंभार पुढे जाईल असे त्या गर्भश्रीमंत असणा-या बाळासाहेबाला वाटत असते. म्हणून कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी त्याचा सत्काराचा कार्यक्रम ठेवलेला असतो. सत्कार होतो आणि पुन्हा माईकजवळ येऊन बाळासाहेब गंभीर आवाजात म्हणतो -

"अशा या महान त्यागी कलावंतानं गणेश मित्रमंडळाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन मूर्तीची किंमत व सजावटीचा खर्च न स्विकारता मंडळाला साडेपाचशे रूपये देणगी दाखल दिले आहेत. त्याबद्दल मंडळातर्फे आम्ही सर्वजण अत्यंत ऋणी आणि कृतज्ञ आहोत."

(पृष्ठ 95)

हे ऐकल्यानंतर एकदम डोक्यावर तापलेलं तेल ओतल्यासारखे झाले. कारण त्याची परिस्थिती चांगली नव्हती. एक महिनाभर केलेले कष्ट आणि चार भावंडांचा व आईचा घास काढून घेतला होता.

बाळासाहेब अक्षरशः नासका नारळ रेवणला सत्कारात देऊन क्रुर थट्टा करतो. ही कथा वाचताना मनोरंजन होते आणि दुसरीकडे मनाला खोल दरीत कोसळल्यासारखी खिन्नता येते. अशा या गरीब श्रेष्ठ कलावंताला इतक्या क्रुरतेने वागवणारा धनदांडगा माणूस हाच आज राजकारणात आघाडीवर आहे हे या समाजाचे दुर्दैव होय.

या कथासंग्रहातील "शेवटचं पायताण" ही कथा स्वतः लेखक आनंद यादव यांची कथा आहे. यातील महत्वाची पात्रे म्हणजे स्वतः लेखक आणि त्याच्या जोडीला त्याची भावंडे, आई व तुका चांभार होय.

या कथेच्या सुरूवातीचे वर्णन पुण्यातील आहे. गावाकडे जायचं होतं पण पायात चप्पल नव्हते होते तेही फाटके तुटके म्हणून चपला घेण्यासाठी लक्ष्मीरोडला हिंडत असतानाच समोर सोन्याचांदीच्या दुकानाशेजारीच बूट, पायताण व चपला यांची दुकानं होती. फक्त गावाकडच्या चपलापेक्षा या चपलांना रंग देऊन सुंदर बनविलेल्या असतात म्हणून त्याची किंमत फार असते. येथे शहरी आणि ग्रामीण भागातील बदलत्या समाज जीवनाचे वर्णन केले आहे.

सौ.च सासर नि माहेर एकाच गावात असल्यामुळं मुलांना नि तिला तिच्या माहेरी पोहोचवली. रात्री आठ नऊच्या सुमारास घरी येऊन पोहोचलो. भावंडं वाटच बघत होती. गेल्याबरोबर लहानग्या फुलानं माझ्या हातातील तुडुंब भरलेली कापडी पिशवी जवळ-जवळ हिसकावून घेतली.

"त्यात काय खायला न्हाई गं, तुटक्या चपला हाईत. मी तिच्या मनातलं ओळखून म्हणालो." (पृष्ठ 98)

यामध्ये लेखक हा शहरात गेल्यामुळे शहरी वातावरणात रमलेला, त्याला काय? चप्पल जरा तुटली की, बाजूला टाकून द्यायची. खेडयात राहणा-या भावंडांना चपला बघून एकदम आनंद होतो. येथे एकाच घरातील पण दोन प्रकारच्या संस्कृतीचा व बदलत्या काळाचा विचार लेखकांनी केलेला दिसतो. चपला बघून आई म्हणते -

"असा पैसा चपलात इन्नाकारणी खर्च करू नगं. शिलकीचा पैसा शिलकीला टाकावा. त्यो असा उधळू नगं. एक जोड फाटल्यावरच दुसरा जोड घ्यावा." (पृष्ठ 99)

असे लेखकाच्या आईला वाटणे साहजिकच आहे. शहरातील जगायच्या कल्पना कळणे शक्य नव्हतं आणि लेखकाजवळही आपण साधे राहावे इतकं मानसिक सामर्थ्यही नव्हते. देश तसा वेश या प्रमाणे वागणे आजच्या काळात शक्य होतं.

अजूनही काही खेडयातून कारू-नारूची संस्कृती आहे. कारू म्हणजे काम करणारे महार, मांग, सुतार, लोहार, चांभार हे कारूमध्ये मोडतात. त्यापैकीच कारु संस्कृतीत बसणारा तुकाम्मा हा एक गावचा चपला बनवणारा चांभार होय. एकेकाळी तुकाम्माकडे भरपूर वैभव होते. कांही दिवसानंतर परिस्थिती पालटली. मुलगा ॲक्सिडेंटमध्ये गेला. त्यानंतर तुकाम्माची अवस्था एकदम दयनीय झाली. म्हणून लेखक स्वतः पुण्यासारख्या शहरात चांगले चप्पल मिळत असूनसुध्दा ते टिकावू नसतात म्हणून आपल्या गावी येऊन चप्पल बनवतात आणि चप्पल तीन-साडेतीन वर्षे टिकतील तोपर्यंत काळजी नाही असे म्हणतात. त्यावेळी तुकाम्मा म्हणतो -

"हयो जोडा तुटायला तीन वर्स लागतील मालक."

तेव्हा लेखक म्हणतात -

"कां लागनात, तुटल्यावर मी येईन."

"त्येचा काय उपेग?" तो कसनुसा हसला.

"का?"

"झाडाची समदी मुळं आता तुटाया लागल्यात. तुम्ही तीन वर्सांनी आल्यावर हितं कुणी

बघायला बी मिळतय का कुणास ठावं." (पृष्ठ 108)

तुकाम्मा हा थकलेला आहे. शहरात रबराच्या चप्पला सुरेख नक्षीकाम केलेल्या मिळतात. त्यामुळे त्यांच्याकडच्या चपला कोणी घेत नाही. रबरांच्या चपलांचा परिणाम होऊन खेडयापाडयातून चांभारांचे धंदे कसे बंद पडले याचे चित्रण यादवांनी या कथेतून केले आहे. त्यामुळे यादव म्हणतात -

"मुकाट होऊन नवं पायताण पायात घालून परतलो. या चांभारवाडयातलं ते शेवटचं पायताण असावं." (पृष्ठ 108)

यातून यादवांच्या मनातील दुभंगलेपण पहावयास मिळते.

यानंतरची कथा म्हणजे "उद्योग वसाहत" ही होय. यातील महत्वाची पात्रे म्हणजे शांता, कामतबाई आणि चुणचुणीत असणारा चंदू.

आधुनिकीकरणामुळे शहरांमध्ये उद्योगधंदे वाढत असतात. त्यामुळे उद्यो करणा-यांची वसाहतही वाढत असते. राष्ट्रीय महारस्त्याला लागून भडगावची उद्योग वसाहत वाढत असते. ही वसाहत गावाच्या बाहेर आहे आणि त्याच गावाच्या बाहेर एका बाजूला नवे टुमदार बंगले व घरे त्या वसाहतीमधून उठून दिसतात.

देशाचा उद्योगविस्तार योजना आखून चालला होता. तेथील उद्योग समुहातून आणि कंपन्यातून ब-याच वर्षाच्या अनुभवानंतर नोक-या करणारी अधिकारी मंडळी नोक-या सोडून उद्योग सुरू करत होती आणि वसाहत निर्माण करत होती. त्यामुळे भडगावचं रंगरूपच उठून दिसत होते.

भडगाव हे दुष्काळी गाव असूनसुध्दा तेथे उद्योगांमुळे व छोटया-मोठया कंपन्यांमुळे तेथील माणसे नीटनेटकी राहत होती. पूर्वीच्या काळच्या बैलगाडया जाऊन मोटा, सायकली, स्कुटर्स फिरत होती.

हा सर्व आधुनिकीकरणाचा परिणाम होता. त्यामुळे तेथील सुशिक्षित बेकार लोकांना, राबून खाणा-या माणसाला चार घास सुखाचे मिळणार होते.

अशा या गावात शांता नावाची कथेची नायिका राहते. शांताची परिस्थिती एकदम

हालाखीची असते. तिचा नवरा दुस-या बाईच्या नादी लागल्याने त्याने तिला सोडून दिले व ती येऊन भावाकडे राहिली. तिचा मुलगा चंदू हा चुणचुणीत आहे. त्यामुळे कामतबाई तेवढंच हेरतात आणि चंदूला आपल्या घरी कामाला ठेवून घेण्यासाठी शांताबाईशी बोलते. तेव्हा कामतबाई म्हणतात -

" शांताबाई, एवढया दहाबारा घरच्या भांडयांचा डोंगराएवढा ढीग रोज दोन-दोनदा घासत बसण्यापेक्षा घासत बसण्यापेक्षा तुम्ही एकाच ठिकाणी निवांतपणे काम का बघत नाही."(पृष्ठ 119)

कारण कामतबाईंना वाटत असते की शांताबाईने आपल्या मुलाला आपल्याकडे कामाला पाठवून दयावे. त्याचे जे काही पैसे होतात त्याचा तेवढाच आधार तिला होईल. चंदूला वाटते आपणास चमचमित खायला मिळेल, हिंडायला - फिरायला, उठायला - बसायला मिळेल. यातील हे वर्णन मनाला एकदम भुरळ पाडणारेच आहे.

' आश्विन - अमित न्हानीघरातून बाहेर आल्यावर त्यांच्या अंगाचा लक्स, हमाम साबणाचा वास दरवळत राहिला, त्यांच्या जवळून जाताना, ते इकडून तिकडून करताना चंदूच्या नाकात शिरे नि त्याचे डोळे सुगंधानं धुंदावून मिटत. कामतसाहेब आणि कामतबाई संध्याकाळी असेच अंगावरील कपडयांवर थोडं अत्तर तुषारून फिरायला बाहेर पडत. त्यावेळीही चंदूच्या भोवतीनं केवडयाचं बन बहरल्यागत होई - - - किती चांगली माणसं हाईत. खायची प्यायची चंगळ हाय. आपल्या कधी नजरंलाबी पडायचं न्हाई असलं अन्न ही माणसं रोज उठून खात्यात. सणासुदीला आपूण साबण लावून कपडा धुता; पण हया घरात रोज साबणाचा सण. रोज इस्त्रीची कापडं. नवी कापडं झक मारावीत असा त्येंचा वास. आपल्या घरात कवा दिवाळीला वासाचा साबण, बारक्या शेंगच्या बुटकाएवढी. अत्तराची कुपी मामानं आणली तर आणली; न्हाईतर न्हाई. हितं रोज अत्तर दिवाळी, रोज रोज वासाचा साबण. नुसता हात धुवायचा असला तरी वासाचा साबण." (पृष्ठ 122)

एकीकडे कामतबाईंच्या घरी चंदू कामाला राहिल्याने चांगली वळणं लागतात पण

दुसरीकडे सतत कामच करत राहिल्यामुळे अभ्यासाला वेळ मिळत नाही. त्यामुळे तो नापास होतो. असा हा दोन संस्कृतीमधील संघर्ष आपणास प्रकर्षाने जाणवतो.

कामतबाईंसारखी पांढरपेशी माणसं आपल्या मुलाला काम न सांगता फक्त चंदूलाच सांगतात. एवढे सर्व करूनसुध्दा चंदूला अभ्यास करून दहावी पास होऊन कामतसाहेबांना नोकरी द्या म्हणून सांगता आले असते.

शेवटी चंदूने वसाहतीच्या दिशेने डोळे फिरवले.

' वसाहतीवर विजेच्या बारीक तारांचं एक प्रचंड जाळं पसरलं होतं. गेल्यावर्षीपेक्षा ते अधिकच गच्च आणि दाट पसरत गेलेलं. देखण्या दिसणा-या कारखानदारांचे गोंडस बंगले दुस-या उलट बाजूनं असेच पसरत गेलेले हळूहळू त्यांचाही चिवट वेढा सगळया गावाच्या मानेभोवती पडत चालला होता.' (पृष्ठ 130)

वर्षानुवर्षे उद्योगधंदे वाढत राहतील. कामतांसारखी अनेक पांढरपेशी मंडळी वसाहत निर्माण करतील. म्हणून या कथेला दिलेले शिर्षक योग्यच वाटते.

यानंतरची कथा म्हणजे ' नवा हिशोब ' ही होय. यातील महत्वाची पात्रे म्हणजे दिना, डॉ.काळे, नव-यानं सोडलेली दिनाची बहिण रत्ना, दिनाची आई आणि अंथरूणाला खिळलेले दिनाचे वडील.

दिना हा कोल्हापूरला डबे पोहचवण्याचे काम करतो. तो शिकलेला होता तरी त्याला नोकरी नव्हती. कारण त्याच्याजवळ पैसा नव्हता. पैसा असता तर नोकरी कुठेही मिळाली असती. तो येतो तेव्हा त्याची आई नसते. आई काळे साहेबांच्या बंगल्यावर गेलेली असते आणि दिनालाही येण्यास सांगते.

साहेबांच्या घरात दिनाची आई व बहिण हलकी-सलकी कामं करायच्या. या कुटुंबाची परिस्थिती चांगली नसते म्हणून या नडलेल्या कुटुंबाला काळेसाहेब एक म्हैस घेऊन देतो. त्या म्हशीचा आपणास आधार होईल असे दिनाच्या आईला वाटते. ही सतराशे रूपयाला घेतलेली म्हैस याचे

पैसे कसे फेडायचे हा प्रश्न दिनाच्या आईसमोर उभा राहतो पण काळेसाहेबाने दोन वर्षाच्या बोलीने दीड लिटर दुध घालायचे मग दोन वर्षांनी ती म्हैस दिनाच्याच मालकीची होणार होती आणि अचानक त्यांची बदली झाली आणि काळेसाहेबांनी वेगळाच हिशोब मांडला. सहा महिने आधीच बदली झाल्यामुळे अडचण आली व उरलेल्या सहा महिन्याचे नऊशे रूपये मागायला लागला. यातून काळेसाहेबांसारखी पांढरपेशी माणसं दिनासारख्या गरिबाला कशी लुबाडतात हेच जाणवते. तेव्हा दिना म्हणतो,

" दुधाचं मी बोलतो सायेब. दीड वरीस आम्ही तुम्हाला रोज दीड लिटर दुध घाटलं हे तर खरं हाय ना ? "

" हो."

" त्येचं दोन हजार सातशे रूपय हुत्यात. म्हशीचं सतराशे रूपय वळतं करून घ्या नि उरलेलं हजार रूपय मला आत्ताच्या आत्ता परत द्या. हरामीचं पैसं खाऊ नका." (पृष्ठ 141)

असे दिनाने सांगून काळेसाहेबाकडचा सगळा हिशोबच मिटवला. हा संघर्षच आपणास वेगळया पातळीवरचा वाटतो. अस्तित्वाचं भान असलेला दिना आपल्यासमोर उभा राहतो. आपल्यावर जो अन्याय होतो त्या अन्यायाविरूध्द पु-या ताकतीने उभा राहतो. म्हणून डॉक्टर म्हणतात

" तुझे वडील मरणाच्या दाढेतून मी बाहेर काढले आहेत. त्यांना मोफत औषधपाणी केलं आहे."

तेव्हा दिना म्हणतो -

" सायेब, ती सरकारी औशीदं हुती आणि माझ्या बाला मरणाच्या दाढंतनं बाहीर कुणी फुकट काढलं न्हाई. सरकार त्यासाठी तुम्हाला पगाराचा पैसा मोजतंय."

(पृष्ठ 140)

यातून दिनासारखा शिकलेला तरूण आपल्यावर या पांढरपेशी लोकांचा अन्याय होतोय, तो अन्याय मुकाटपणे सहन न करता त्या अन्यायाविरूद्ध दाद मागायला उभा आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIV...

आनंद यादवांच्या या लिखाणामध्ये असणारी प्रेरकता, मारकता आणि भविष्याविषयीचा आशावाद वाचकांच्या मनात पल्लवित होतो. त्यामुळे ग्रामीण विभागातून शिकणा-या तरूण वयातील मुलांना आनंद यादव हे आपले लेखक वाटतात.

नंतरची कथा म्हणजे ' हिरवी संस्कृती ' होय. यातील महत्वाची पात्रे म्हणजे प्रा.भोईटे, त्यांच्या पत्नी ताराबाई आणि क्लास चालवणारे प्रा.पदकी.

प्रा.भोईटे हे पुण्यासारख्या शहरात अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत. खेडयातून येऊन स्थायिक झाले आहेत. खेडयामध्ये सगळीकडे हिरवीगार शेती दिसते. शहरात तसे नाही. त्यामुळे त्यांची नजर सतत शेतीकडे आणि मळयाकडेच असते. पण प्रा.भोईटयांना तसे करून चालणार नव्हते. शनिवारचे तास संपवून भोईटे परत आले. आल्यानंतर पत्रं काय आलेय हे पाहायची त्यांची सवय आहे. पत्र वाचलं आणि ते गप्प पडून राहिले. त्या पत्रामध्ये दत्तूनं शेतकरी आंदोलनात भाग घेतला होता आणि त्याच्या पायाला गोळी लागली होती. त्यामुळे तो जन्माचा अधू होईल की काय याची भिती वाटत होती. नंतर कॉफी घेऊन पुस्तकांच्या कामाकडे वळले. कारण बी.ए.च्या अभ्यासक्रमाला धरून अर्थशास्त्राचं पुस्तक लिहावयास सुरूवात केली होती. व्यवहारी दृष्टीची असणारी त्यांची पत्नी ताराबाई यांनी मोठी मुलगी लग्नाला आल्याची गंभीर जाणीव करून दिली होती आणि लग्न ठरलं तर खर्चासाठी म्हणून त्यांच्याजवळ एकही पैसा नव्हता म्हणून ताराबाई, शेतामध्ये लक्ष घालण्यापेक्षा पेपर तपासावेत, एक दोन पुस्तके लिहावित, पैसा मिळतो. त्या पैशातून या मध्यमवर्गीय असणा-या कुटुंबाला आधार मिळणार होता. हे सर्व वाटत होते तरीही प्रा.भोईटयांची मातीशी असणारी ओढ काही संपत नव्हती. त्यामुळे ते म्हणतात -

" उन्हाळयात गावाकडं मी गेलोच नाही. "

" हं । " ताराबाईंनी नुसताच होकार भरला.

" ही गोष्ट काय चांगली झाली नाही. "

" दोन दिवस जाऊन आला असतात तर चालण्यासारखं होतं की. "

> "गावाकडं गेलं की, मळयावर गेल्याशिवाय चैन पडत नाही. आणि मळयावर गेलं की, हे करावं, ते करावं असं वाटू लागतं. तसं वाटू लागलं की सगळी सुट्टी त्यातच जाते". (पृष्ठ 147)

यातून प्रा. भोईटे यांना ग्रामीण संस्कृतीबद्दल व तेथील मातीबद्दल अनामिक ओढ आहे हे जाणवते.

प्रा. भोईठयांची आठ-नऊ एकर शेती होती पण त्यामध्ये पोटभर पुरेल इतकंही मिळत नव्हते. नोकरी लागल्यानंतर त्यांना शेतीसाठी पैसा वापरता आला आणि शेती भरभराटीला आली.

खेडयातील नाहीतरी पुण्यासारख्या घरातील परडयात भाजीपाला करू लागले. भेंडया, वांगी, मेथी, बावची आणि घरच्यांना ते खाऊन दाखवू लागले. 'कच्चा भाजीपाला खाल्ला की रक्तशुध्दी होते..." म्हणून घरच्यांना सांगत. पण घरच्यांना त्यांचं हे वेड नॉस्ट्रॅल्मिक वाटे. मुली दुसरीकडे बघून ओठातल्या ओठात हसत एकमेकाकडे बघून डोळे मोठे करत. यातूनच भोईटयांची मुले शहरी संस्कृतीशी कशी घट्ट जखडली गेली आहेत हेच दिसते. ग्रामीण आणि शहरी संस्कृतीतला भेद यादवांनी दाखवला आहे.

प्रा. भोईटयांच्या पत्नी ताराबाई त्यांना सतत शहरात गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. पण भोईटे हे मातीच्या अनामिक शक्तीने खेचल्यासारखे वाटतात . ते पत्नीला म्हणतात -

> "तुला नाही कळायचं. नुकसानीत आली तरी शेती टिकवली पाहिजे."…. पुढचं ते मनोमनच बोलू लागले. समाजाचा चुकलेला हिशेब उद्या त्यालाच निस्तरावा लागेल. सगळी घडी नीट बसेल. शेतीशिवाय तरणोपायच नाही, इथं कुणाला. ती आहे म्हणून देश आहे. खेडी आहेत. म्हणून ही शहरं आहेत … आपण आहोत आपली संस्कृती आहे". (पृष्ठ 157)

प्रा. भाईटयांना शेतीविषयी किती ओढ आहे हेच या कथेतून जाणवते.

ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या' व 'ग्रामीण साहित्य समाज आणि संस्कृती' या

पुस्तकात त्यांनी जे महत्वाचे असणारे विचार मांडले आहेत त्याच विचारांना येथे कथारूप दिले आहे.

यादवांना शेतीबद्दल अतिशय ओढ आहे ते शिकलेले आहेत. शिकल्यानंतर पांढरपेशा होणे त्यांना नामंजूर आहे. शेतीत कष्ट करावयाचे एवढेच माहित आहे. त्यामुळे त्यांनी भोईटयांसारखा शेतीबद्दल व खेडयातील संस्कृतीबद्दल ओढ असणारा प्राध्यापक चित्रित केले आहे.

यानंतरची कथा म्हणजे "गीताबाई मरण पावली" ही होय. यातील पात्रे म्हणजे निवेदक, गीताबाई इत्यादी होत. गीताबाई ही मोलकरीण आहे. ती सर्वांना परीचयाची असते. कथेचा नायक जेवत असताना त्यांच्या पत्नीनं "गीताबाई मरण पावली" म्हणून सांगितले तिला पोटालाही कांही मिळत नव्हते. ती वत्सला वहिनींच्याकडे कामाला होती. त्यांच्यात खूप माणसं येत त्यामुळे उरलं -सुरलं तिला मिळते. तेवढेच पोरांचे व तिचे पोट भरत असे.

गीताबाईला तीन मुलं होती. चौथे तिच्या पोटातूनच गेले, गीताबाई मेली तेव्हां कोणीही तिकडे गेले नाही. पण 'साफल्य' मधले वासुदेवकाका मरण पावले तेव्हा गल्लीत सगळी गडबड उडाली होती. एकीकडे गीताबाईची संस्कृती आणि दुसरीकडे पांढरपेशांची संस्कृती या दोन संस्कृतीमधला संघर्ष यादवांनी चित्रित केला आहे.

गीताबाई मेली तेव्हा तिच्या उशाला दोन रूपये ऍंशी पैसे होते. त्यांच्याच वस्तीतील लोकांनी दोन-दोन रूपये पट्टी काढून तिला जाळली. त्यांच्यात एकजूट होती म्हणूनच हे घडले.

यानंतरची कथा म्हणजे "पाषाणाची माणसं" ही होय. यातील मुख्य पात्रे म्हणजे कॉंट्रॅक्टर असणारे जंगमसाहेब, त्यांचा मुलगा डॉ. राहूल इत्यादी होत.

जंगमसाहेब पुण्यामध्ये मोठे कॉंट्रॅक्टर असतात. पण त्यांना शहरी वातावरण नको असते. खेडयामध्ये त्यांचं मन रमतं. शहरातील माणसे ही कामापुरतीच असतात. कारण त्यांनी बिल्डींग बांधलेल्या असतात. त्यामध्ये कार्यालये, राहण्यासाठी घरे असतात पण तेथील माणसांनी आपल्याला विचारावं असं त्यांना वाटे. आपणास आपुलकीने बोलवावे. म्हणून त्यांना या शहरी वातावरणापेक्षा खेडयामध्ये

जाऊन रहावं असे वाटते. शहरातील लोक कठोर आहेत असे त्यांना सतत वाटत असते. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचं पुण्यात मन रमत नाही. म्हणून आपल्या गावी कळमला घर बांधायचं ठरवतात. तेथील गरिबांच्या मुलांसाठी आश्रम पध्दतीने शाळा काढावी. पण त्यांचा मुलगा राहूल म्हणतो की, इथंही गरीब मुलं आहेत, इथेसुध्दा शाळा काढता येईल. त्याचे न ऐकता कळमला घर बांधतात. धार्मिक विधी करतात. तेथील कामगारांना, कष्टकरी लोकांना जेवण घालतात. त्यामुळे त्यांचे समाधान होते. त्यांना लोकांची जाणीव होती. म्हणूनच जंगमसाहेबांना निवृत्तीनंतर आलेला भेसूर एकटेपणा आणि कंटाळपणा कुठल्या कुठं पळून गेला होता. यातून शहरात कार्य करणा-या जंगमसाहेबांची मूलं त्यांच्या खेडयात रूतली आहेत हेच जाणवते.

यानंतरची कथा म्हणजे "भिंत" ही होय. इंद्रभवनची मुख्य इमारत होती. देखण्या, तांबडया मंगलोरी कौलांचा मोठा बैठा बंगला, दगडी बांधकामाचा तो सोमेश्वर शेठ उटगींनी बांधलेला आहे. नारायणशेठ उटगी व गोविंदशेठ उटगी हे त्यांचे दोन चिरंजीव त्यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आपल्या उद्योगाचा विस्तार केला आहे. या 'इंद्रभवन उद्योग समुहाजवळच असणा-या झोपडपट्टीतील माणसे दंगे करून इंद्रभवन या इमारतीची जाळपोळ करतात. खरं म्हणजे उटगी ग्रुप हा श्रीमंत आहे. त्यांनी दुसरीकडून येऊन महाराष्ट्रात स्थायिक होऊन आपला उद्योग वाढवला आहे. म्हणून श्रीमंताविषयी झोपडपट्टीतील माणसांच्या मनात असूया आहे. त्यामुळे जाळपोळ, हिंसाचार होतो आणि याचा परिणाम होऊन इंद्रभवन आणि झोपडपट्टी यांच्यात प्रचंड भिंत उभारली जाते. तसे पाहिले तर झोपडपट्टी ही इंद्रभवनच्या मोठया इमारतीच्या पायात गाडल्यासारखी वाटते. अशा या दोन संस्कृतीचे वर्णन आपणास 'भिंत' या कथेत पहावयास मिळते. खेडयातच नव्हे तर शहरातही उच्च स्तर आणि निम्न स्तर आढळून येतो.

*** विषयानुरूप आनंद यादव यांनी लिहलेल्या कथा ***

1) दारिद्रयाचे चित्रण करणा-या कथा -

1) बापू

2) आक्कूमावशी

3) पोरका दिन्या

4) लंगडा गोपा

5) भाडेकरू दत्तू

2) शेतमजुरांचे चित्रण करणा-या कथा -

1) हाताबुडी आलेला शिवा

2) पोरका दिन्या

3) लंगडा गोप्या

3) सधन शेतक-यांचे चित्रण करणा-या कथा -

1) चावीचं पाणी

2) फाटयाचं पाणी

3) आंघोळीचा दिवस

4) जातीव्यवस्थेचे चित्रण करणा-या कथा -

1) बापू

2) लंगडा गोपा

3) खुळा विठू

5) विवाहबाह्य संबंधाच्या कथा -

1) चव्हाणाचा आबामा

2) धोंडबा खादाडया

6) अंधश्रध्देवरच्या कथा -

1) सखाराम

7) विधवांच्या समस्या असणा-या कथा -

1) कष्टाची लक्ष्मी

8) विविधरंगी व विविधढंगी व्यक्तीरेखा -

1) हाताबुडी आलेला शिवा
2) बापू
3) चव्हाणाचा आबामा
4) आक्कू मावशी
5) भाडेकरी दत्तू
6) गडी
7) सखाराम
8) बाबजी बल्लाळ
9) फुला आत्ती
10) पोरका दिन्या
11) तपस्विनी
12) धोंडबा खादाडया
13) खुळा विठू
14) लंगडा गोपा

9) बेकार तरूणांचे चित्रण करणा-या कथा -

1) चावीचं पाणी
2) भोवळ

10) यंत्रसंस्कृतीचा ग्रामीण जीवनावर परिणाम करणा-या कथा -

1) कष्टाची लक्ष्मी
2) शेवटचं पायताण

11) ग्रामीण जीवनाची ओढ असणा-या कथा -

1) हिरवी संस्कृती

2) पाषाणाची माणसं

12) राजकारणावरच्या कथा -

1) गावचा मुख्यमंत्री

2) फाटयाचं पाणी

3) फळया आणि पारंब्या

4) सत्काराचा नारळ

13) संघर्षाच्या कथा -

1) फुला आत्ती

2) हाताबुडी आलेला शिवा

3) पोरका दिन्या

4) हिरवी संस्कृती

5) कष्टाची लक्ष्मी

6) पाषाणाची माणसं

7) उद्योग वसाहत

8) नवा हिशोब

9) भिंत

10) बापू

11) फाटयाचं पाणी

12) गीताबाई मरण पावली.

1) दारिद्रयाचे चित्रण करणा-या कथा :-

बापू (मातीखालची माती) हा जातीने मांग आहे. प्रत्येकाच्या शेतांत जाऊन काहीना काही चोरी करतो आणि चोरी करूनसुध्दा आपण चोरी केली हे कबूलही करीत नाही. वर 'तुझ्याकडचं भाराभर गवत मागायला यावं म्हणत होतो' असे म्हणायलाही कमी करत नाही.

रस्त्याने जाणा-या धनगरांकडून न्याहरीला म्हणून थोडी भाकरी मागून खाणारा हा बापू अन्नासाठी कसा महाग झाला आहे हेच जाणवते. याच धनगरांचे बकरे पकडून तो मारतो व ते कळल्यावर दादा त्याला विचारतात त्यावर बापू म्हणतो -

"न्हाईगा, उन्हाळयाचं दिस, कुठंच हात सरकंना पोटालाबी काय न्हवतं..... काय करतोस। जगलं तरी पाहिजे हे पॉट गप बसू देतंय व्हय?" (पृष्ठ 39)

यातून बापू दारिद्रयाचे जीवन जगताना दिसतो. इतके दारिद्रय त्याच्या वाटयाला आलेले असते.

"आक्कूमावशी" (मातीखालची माती) या कथेत आक्कूमावशी एकटीच आहे. मुलगा असतो पण तो असून नसल्यासारखाच. दिवसभर जुगार खेळतो. जुगाराच्या नादात घरातील असतील-नसतील तेवढी भांडी विकतो. वर आडवले तर आईलाच दोन लाथा घालतो.

आक्कूमावशीच्या घराच्या पाठीमागं संपूर्ण गावची असणारी देवी ताईबाई आहे. बेंदराच्या सणाला सगळया गावाचा नैवेद्य जातो. एकदा लेखक ताईबाईला नैवेद्य देऊन जातो. पण खुरपं तिथं विसरतं म्हणून आणण्यासाठी परततो. काळोखात खुरपं घेतो. ताईबाईकडे निरखून पहातो त्यावेळी लेखकाला दिसते की, आक्कूमावशी येशेल तेलाचं ठावकं विझवून, ओढयात पोळया, अंडी घेत कोंबडीचं पिल्लू धरण्यासाठी धडपडत असते.

यातून तिचे दारिद्रय आणि भूक दडलेली दिसते.

"पोरका दिन्या" (मातीखालची माती) या कथेत दिन्याच्या आईच्या नव-याला खुनाच्या आरोपाखाली शिक्षा झाली होती. 1-2 वर्षे वाट पाहिली आणि बिनलग्नाची भैरू चिखल्याजवळ राहिली.

तेव्हां तिला दिन्या झाला. तिचा नवरा तुरूंगातून सुटून आला व तिला घेऊन गेला, दिन्या पोरका झाला. त्यानंतरतो लेखकाच्या घरी रहायला आला. पोरक्या दिन्याचे वर्णन लेखकाने फारच मार्मिकतेने केले आहे ते लिहतात-

> "चोखून चोखून आंब्याची कोय उकिरडयावर टाकावी, तिला शेणाचं खत मिळावं, खरकटया पाण्याची ओल चिकटावी आणि हवा खाऊन ती वाढावी, तिथंच जगावी, उकिरडयाचे उपकार मानावे .... न मरता दिन्या असाच जगला आमच्या इथं" (पृष्ठ 119)

लंगडा गोपा (मातीखालची माती) हा जातीने मांग आहे. त्याच्याकडे दोन आ-यांची तांबूस रानाची पट्टी आहे. तेथे गोपा राबत असतो. पावसाळयात गोपाच्या रानातून पायवाट पडते आणि त्यातील निम्मी पट्टी तुडवली जाते. पायाने अधू असणारा हा गोपा. त्याला काहीही काम होत नाही. प्रत्येकाकडे शिळी-पाकी आमटी, कादि, भाकरी मागतो. पण कोणीही त्याला नाही म्हणत नाही. सतत कामच करत राहतो एक दिवस मुलाला बरं नसतं तेव्हा दादा मुलाला कसं आहे म्हणून विचारतात . तेव्हा म्हणतो -

> "पॉर मेलं मालक परवा दिशीच. तुम्ही दिलेल्या मक्याच्या कण्या त्येनं हूं म्हणून भुकंच्या पोटी खाल्या नि मक्कं पोटात फुगून पॉट बोदागत झालं. कसंबसं मग एक दिस जगलं".
>
> "मग कसा येशील तू कामाला".
>
> "त्येला काय हुतंय? पोटाच्या पाठी लागून ते मेल आम्हीबी असंच एक दीस मातीआड व्हायचं पॉट पॉट करत।" (पृष्ठ 182)

पोटासाठी अगतिक झालेला गोपा आपल्या मुलाचे मरण सहजतेने सांगतो. इतका हा माणूस दारिद्रयाने पिंजला आहे.

"भाडेकरू दत्तू" (मातीखालची माती) दत्तूला स्वतःची जमीन नाही. बैल, औत एवढंच त्याचं वैभव आहे. तो दुस-यांच्या शेतात भाडयाने औत नेतो. बैलंही मरायला टेकलेली म्हणून त्याला रोजावारी काम कोणी देत नाही. बैलं उपाशी आहेत ती बघवेनात म्हणून म्हादबाच्या मळयातून वैरण चोरतो. बैलं दुस-यांच्यात बांधतो तेथून चोरटा आहे म्हणून हाकलून देतात. चांगला बैल देऊन कमी किंमतीत दुसरा बैल घेतो आणि येईल तो दिवस ढकलीत असतो.

2) **शेतमजुरांच्या चित्रण करणा-या कथा -**

आनंद यादवांच्या कथेत शेतामध्ये काम करणारे शेतमजुर व त्यांची असणारी थोडीफार शेती करत करत मजुरी करणारे शेतकरी दिसतात.

"हाताबुडी आलेला शिवा" (मा.मा) हा कामामुळे त्रस्त झालेला आहे. त्याच्यावर लहान वयात कामाची जबाबदारी पडली. शेती आहे पण ती थोडीच. त्याच माळवंच येतं ते विकून येईल त्या पैशात घर चालवायचं असतं म्हणून दुस-यांच्यात कामाला जातात.

शिक्षणासाठी परगावी असणारा आपला मोठा भाऊ जेव्हा सुट्टी संपवून जाण्यास निघतो तेव्हां शिवा म्हणतो -

> "दादा, कोकणात चाललाईस .. येतान चार-पाच पोती भात तरी आण मोटारीच्या टपावर टाकून". (पृष्ठ 13)

"पोरका दिन्या" या कथेच्या सुरूवातीलाच चोखून चोखून आंब्याची कोय उकीरडयावर टाकावी तसा हा दिना आहे. आई-बापाविना निराधार असणारा हा दिन्या कमालीचा दारिद्रयात जगणारा आहे. तो दुस-यांच्या शेतात राबून खातो.

'लंगडा गोपा' जातीने मांग आहे. त्याची लांबच्या लांब दोन आ-याची पट्टी आहे. त्यातून पायवाट पडलेली असते. शेताबद्दल व गोपाबद्दल पुढील उद्गार महत्वाचे वाटतात.

"जरा वाळीप पडली की त्या तांबुळ खडकातलं आहे नाही ते पिक वाळून जातं . शेत ओसाड पडतं गोपाच्या नशिबागत तरी गोपा त्यात राबतो ". (पृष्ठ 171)

असा हा गोपा दुस-यांच्या शेतात रोजगाराला जातो. रोजगार काही नसेल त्यावेळी तो आपल्या शेतात जातो.

**3) सधन शेतक-यांचे चित्रण करणा-या कथा -**

यादवांच्या काही कथांमधून सधन शेतकरी पहावयास मिळतो. 'चावीचं पाणी' या कथेत कृष्णाच्या भाऊबंदातील असणारा नाथा कणिरे याच्याकडे चावी असते. त्या चावीचं पाणी धो - धो वहाते तरीही पाणी भरून देत नाहीत. तेथून कृष्णाला हाकलून देतात. नाथा कणिरे जवळ भरपूर पैसा आहे, वैभव आहे. असा हा सधन शेतकरी दिसतो.

'फाटयाचं पाणी" या कथेचा नायक लक्षू या सैनिक आहे. त्याचेकडून पाण्यासाठी हिंगेसाहेबाने पैसे घेऊ नयेत असे वाटते. कॅनॉलच्या पाण्यामुळे सगळीकडे हिरवेगार दिसते. त्यात सरपंच ही सामील असतात. लक्षूला पैसे न भरल्यामुळे पाणीही मिळत नाही. याचा विदारक अनुभव येथे येतो.

"आंघोळीचा दिवस" (उखडलेली झाडे) या कथेत सुखवस्तू कुटुंबाचं चित्रण केले आहे. आण्णांची मुलं शिकल्यामुळे शेती घेतली. तेथे पाणी आलं आणि दादा शंकरला घेऊन राबले. त्यामुळे पाच एकराच्या जागी अठरा एकर शेती घेतली.

**4) जातिव्यवस्थेचे चित्रण करणा-या कथा -**

आनंद यादवांनी आपली कथा ही शेतीशी निगडीत न ठेवता इतर अर्धस्तरीय समाजाचे चित्रण केले आहे. खेडेगाव म्हटले की तेथे 'असणारा समुह, कारू-नारू संस्कृती आणि प्रत्येक जातीचे छोटे मोठे समुह असतात.

"बापू" (मा.मा.) बापू हा जातीने मांग आहे. गावात माळव्याची चोरी करतो, बकरं चोरतो, वैरणीचा भारा चोरतो आणि चोरी केली तरी नाकबूल करतो. तर सगळयांच्यावरच गुरगुरतो. असा हा बापू बेरकी आहे. त्याचा स्वभाव, जगण्यासाठी काहीही करण्याची धडपड पाहून आपल्यासमोर व्यंकटेश माडगुळकरांचा 'शिदा चांभार' उभा राहतो.

'लंगडा गोपा' , गोपा हाही मांग आहे. तो पायाने अधू असुनसुध्दा सगळी कामे करतो.

"खुळा इठू" (मा.मा.) हा जातीने धनगर आहे. विठूला आपली बायको बाहेरख्याली वाटते व मुलगाही दुस-याचा वाटतो. गरीब मेंढरागत डोळे असणारा विठू आपल्या बायकोला व्यभिचारापासून मुल झाले या जाणिवेने खुळा होतो.

5) **विवाहबाह्य प्रेमसंबंधाच्या कथा** -

"चव्हाणाचा आबामा" आबामा हा पैलवान आहे. पैलवानकीत त्याने मान कधी खाली घातली नाही. असा हा आबामा गुळव्याचं काम करण्यासाठी एका गावाला जातो तेथे ब्राम्हण विधवा तरूणीशी त्याचे संबंध येतात. आणि दोघांचं जमतं . जीवाला जीव लावतात. एका मनाने संसार करू लागतात.

"धोंडबा खादाडया" (मा.मा.) सतत खाणारा असल्यामुळे बायकोला मारायचा त्यातच ती मेली आणि धोंडबा इठा मिसाळणीजवळ राहिला. यातून भूक आणि काम या दोन्हीही वासना इथे पूर्ण झाल्या.

6) **अंधश्रध्देवरच्या कथा** -

खेडेगावात अंधश्रध्दा कशी वाढते आहे याच्यावर प्रकाश टाकला आहे.

"सखाराम" हा जोगता आहे. त्याच्या स्वप्नात यल्लुबाई आली आणि तिने बाईसारखे रहावयास सांगितले. तेव्हापासून सखाराम बाईसारखे वागू लागला. चालणे, बोलणे सर्व बायकांसारखे असा हा जोगता असणारा सखाराम अंधश्रध्देला कसा बळी पडला आहे याचे चित्रण येते.

7) **विधवांच्या समस्या** -

"कष्टाची लक्ष्मी" (उखडलेली झाडे) यात गंगाराम मेल्यानंतर त्याच्या बायकोला कष्ट करावे लागते. आपल्या मुलाबाळांना सांभाळावे लागते. त्यामुळे तिची करूण कथा आपल्यासमोर उभी राहते. दिवसभर प्लॅस्टीकच्या वस्तू गोळा करून कसेतरी ढकलायची. सगुणा, दुर्पी, गोंदा यांचे पोट

भरता भरता ती मेटाकुटीला आलेली. दिवाळी जवळ आल्यामुळे पुजायला साळुते लागतात म्हणून ती साळुतं करून विकायला घेऊन जाते. पण शहरात साळुते कोणी घेईना कारण तेथे लांब दांडयाचे झाडू आले होते. ती कल्पना करत राहते की साळुतं विकून दिवाळीच्या सणाला पोरांना गोडधोड करून घालता येईल. पण ते तिच्या नशिबी नव्हतं.

ही कथाच एका विधवेची करूण कहाणी आहे. या विधवेच्या वेदनेबरोबर पारंपारिक धंदे कसे बसले याचे चित्रण यादवांनी या कथेत केले आहे.

8) **विविधरंगी व विविधढंगी व्यक्तीरेखा -**

हाताबुडी आलेला शिवा हा लहान वयात कामाचा बोजा पडल्याने त्रस्त झालेला आपणास दिसतो.

बापू हा जातीने मांग आहे. कुणाचेही काहीही चोरतो. वर चोरी केली हे नाकबुल करतो व दुस-यांच्यावर गुरकावतो. असा हा बेरकी बापू यादव चित्रीत करतात.

चव्हाणाचा आबामा हा तरूणपणात पैलवानकी केलेला उत्तर आयुष्यात मात्र ^तिला^ उतरती कळा लागते.

आक्कुमावशी ही एकटीच आहे. कोंबडीचं पिल्लू, नैवेद्य घेते. अशी ही आक्कुमावशी भुकेसाठी व्याकुळ झालेली दिसते.

भाडेकरू दत्तू हा दुस-यांच्यात भाडयाने औत नेणारा पण बैलं थकलेली, औत मांडलेला म्हणून त्याला काम कोणी देत नाही.

गडी हा लेखकाच्या घरी कामाला येतो. कमी पैशात गडी मिळतोय म्हणून ते कामाला ठेवतात. पण तो कामचुकारपणाच करतो.

सखाराम हा जोगता आहे. त्यांचे चालणे, बोलणे , वागणे सर्व बायकांसारखे असते.

बाबजी बल्लाळ हा प्राणीमात्रावर प्रेम करणारा बाबजी व त्याची बायको रकमा आपणास दिसते.

फुलाआत्ती ही तोंडगळ असणारी आहे. आपल्या सुनेला सहाही मुलीच म्हणून तिचा छळ करते अशी ही फुलाआत्ती.

पोरका दिन्या हा आई ना बाप असणारा आहे. त्याच्या आईच्या नव-याला शिक्षा झालेली असते. म्हणून ती भैरू चिखल्याजवळ येऊन राहते तिला दिन्या होतो. तिला तिचा नवरा घेऊन जातो. दिन्या पोरकाच होतो

तपस्विनी मधील गर्भश्रीमंत घराण्यातील नानी ही शंकराच्या कृपेनं झालेली. बारा वर्षे उपास केल्यानंतर तिला शंकर प्रसन्न होतो . श्रध्दा आणि निष्ठा यांच्या जोरावर प्रकाश टाकणारी कथा आहे.

धोंडबा हा सतत खातच असतो. जर खायला काही मिळाले नाही तर बायकोला मारहाण करतो असा हा धोंडबा खादाडया असतो.

खुळा इटू हा जातीने धनगर आहे. बायको आपली नाही व मुलगाही आपला नाही. म्हणून इटू खुळा होतो.

लंगडा गोपा जातीने मांग आहे. पायाने अधू असला तरी सतत कामच करतो.

9) **बेकार तरूणांचे चित्रण करणा-या कथा** -

"भोवळ" (उखडलेली झाडे) या कथेत रावसाब शिकलेला आहे. आईने व बहिणीने दिवसरात्र कष्ट करून त्याला शिक्षणासाठी पैसा दिला. गरीब परिस्थितीत शिकूनही त्याला नोकरी नाही म्हणून त्याची घोर निराशा होते.

"चावीचं पाणी" या कथेतील कृष्णा बी.कॉम. होऊन सुध्दा नोकरी नाही.

10) **यंत्रसंस्कृतीचा ग्रामीण जीवनावर परिणाम** -

"कष्टाची लक्ष्मी" मध्ये गंगारामची बायको, शिंदीची पाने आणून साळूते तयार करते व शहरात विक्रीला नेते. पण लांब दांडयाचे झाडू आल्यामुळे ते कोणी घेत नाही. एक बाई म्हणते -

"नको नको, केरसुण्या आम्ही वापरत नाही, असे लांब दांडयाचे झाडू लागतात आम्हांला, उभ्यानं झाडायला बरं पडतं.

यातून बदलल्या काळाची तिला जाणीव नव्हती असे दिसते.

**11) ग्रामीण जीवनाची ओढ -**

"हिरवी संस्कृती"मध्ये प्रा. भोईटे हे व्यवसायाने प्राध्यापक असूनसुध्दा शेतीमातीशी चिकटून आहे. त्यांचे मनच शेतीत व तेथील मातीत गुंतल्यामुळे त्यांना त्याबद्दल ओढ आहे.

"पाषाणाची माणसं" मध्ये जंगमसाहेबांचे आयुष्य पुण्यात गेले तरी सेवानिवृत्त झाल्यानंतर आपल्या गावी कळमला घर बांधायचं ठरवतात. यातूनच त्यांची मुळं ही ग्रामीण जीवनाशी चिकटून आहेत.

**12) राजकारणावरच्या कथा -**

लोकशाही आली आणि सत्तेचे विकेंद्रीकरण झाले त्यामुळे खेडयापाडयात राजकारण गेले. सत्तेसाठी दंगे निर्माण झाले व जनसामान्यांचे जीवनच ढवळून निघाले.

"गावचा मुख्यमंत्री" यात शरदला बाळासाहेब प्रचारापुरताच बोलावतो. तो अनंकांचा प्रतिनिधी आहे. यातूनच त्याला राजकारणाचे धागेदोरे समजतात.

"फाटयाचं पाणी" मध्ये लक्षू कॅनॉलचं पाणी आपल्याला मिळावं म्हणून खुप प्रयत्न करतो पण त्याला पाणी मिळत नाही. यात राजकीय दृष्टीने भ्रष्टाचारच चालतो.

"फळया आणि पारंब्या " मध्ये राजकारणाचे डाव प्रतिडाव कसे चालतात याचे चित्रण येथे येते.

"सत्काराचा नारळ" मध्ये अट्टल राजकारणी असणारा बाळासाहेब रेवणला सत्काराच्यावेळी कुजका नारळच देतो.

**13) संघर्षाच्या कथा -**

"फुलाआत्ती" या कथेत सुनेला सहाही मुलीच झाल्या मुलगा नाही म्हणून छळ करते. इथे सासु आणि सून यांच्यातील संघर्ष चित्रित होतो.

"हाताबुडी आलेला शिवा" मध्ये दादांची एक पिढी आणि शिवासारखी दुसरी पिढी अशा दोन व्यक्तींचा संघर्ष हा दोन पिढयांचा संघर्ष असतो.

"पोरका दिन्या" यामध्ये दिन्यासारखा असणारा शेतमजूर आणि गणपासारखा असणारा शेतमालक यांचा संघर्ष इथे चित्रीत होतो.

"हिरवी संस्कृती" , "कष्टाची लक्ष्मी" , "पाषाणाची माणसं" याही कथांमध्ये शहरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती यांचे वर्णन येते.

'उद्योग वसाहत' मधील कामतबाई आणि गरीब असणारा चंदू. 'नवा हिशोब' मध्ये पांढरपेशी असणारे काळे आणि दिनासारखा शेतमजूर . 'भिंत' मध्ये उटगी ग्रुप. या सर्वांचा समुह असल्यामुळे तेथे संघर्ष निर्माण होतो.

"बापू"मध्ये बापू आणि तेथील समाज. "फाटयाचं पाणी" मध्ये लक्षू आणि तेथील लोकांचा समूह. "गीताबाई मरण पावली"मध्ये मोलमजूरी करून पोट भरणारी गीताबाई व तेथील पांढरपेशी लोकांचा समुह एक व्यक्ती, आणि समुह यांचा संघर्ष निर्माण होतो.

**निष्कर्ष :-**

आनंद यादवांच्या "मातीखालची माती" व "उखडलेली झाडे" या दोन कथासंग्रहांचा विचार केला तर आणि अभ्यास केल्यानंतर मला आढळले की, दोन्हीही कथासंग्रहातील लोकांच्या समस्या सारख्या, दारिद्रयही जवळ-जवळ सारखेच, कष्ट करून जगण्याची पध्दतीही सारखीच त्यामुळे हे दोन कथासंग्रह मी निवडले. मी त्या भागातील असल्यामुळे कथा वाचताना आपण त्या भागात वावरत आहोत की काय असे वाटते.

"मातीखालची माती" हे 1965 सालचे पुस्तक "उखडलेली झाडे" हे 1986 चे पुस्तक आहे. 'मातीखालची माती' पासून यादव कथाकार म्हणून महाराष्ट्राला परिचित झाले आणि येतील तशा व्यक्तीरेखा रेखाटल्या. त्यातूनच लेखनी पुढेपुढे सरकेल तसतशी त्यामध्ये सखोलता जाणवली आणि "उखडलेली झाडे" मध्ये ती अधिक प्रगल्भ झाली.

नवीन कथाकारांना आनंद यादवांच्या लिखाणामुळे एक प्रकारची प्रेरणा मिळेल. अशि खरोखरच या कथा वाचताना आनंद वाटतो. त्यातील सौदर्यामुळे कोणती याचा विचार आपण पुढील प्रकरणात करणार आहोत.

* * * * *